नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com



* वर्ष १७ * अंक ८१ * * भंडारा * मंगळवार, दिनांक २३ सप्टेंबर २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## रेवड्यांसाठी कर्जखोरी

आपल्या महाराष्ट्र राज्यावर सध्या उत्पन्नाच्या तुलनेत जवळजवळ १९% पेक्षा थोडे कमी कर्ज आहे. याचाच दुसरा अर्थ असा की, आपल्यावर दहा लाख कोटींच्या जवळपास कर्ज आहे. पण त्यासाठी आपण अजिबात घाबरण्याचे कारण नाही. भारताच्या महालेखा परीक्षकांनी एका अर्थ अहवालामध्ये आपल्या देशातील राज्यांवर असलेल्या कर्जाचे आकडे जाहीर केले. त्यामध्ये काही राज्यांचे उत्पन्न आणि त्यांनी घेतलेले कर्ज यांच्या बाबतीत मोठ्या प्रमाणात कर्जखोरी झालेली आहे. असे निरीक्षण समोर आलेले आहे. म्हणजेच काही राज्ये उत्पन्नाच्या तुलनेत जास्त कर्ज घेण्यावर प्रचंड आघाडीवर आहेत. यामध्ये आपल्या पंजाब राज्याने त्यांच्या वार्षिक उत्पन्नाच्या ४० टक्क्यांपेक्षा अधिक कर्ज घेतलेले आहे. याप्रमाणेच नागालँड यांनी ३७%, पश्चिम बंगाल, हिमाचल प्रदेश आणि बिहार ही राज्ये ३३ ते ३४ टक्के च्या आसपास उत्पन्नावर कर्ज घेण्यासाठी आघाडीवर आहेत. आता राज्यांच्या बाबतीतील कर्ज घेण्याचा नियम असा आहे की कोणत्याही राज्याने आपल्या उत्पन्नाच्या २५ टक्क्यांच्या वर कर्जच घेऊ नये. पण २०२३ चे वर्ष म्हणजेच आर्थिक वर्ष संपेपर्यंत देशातील राज्यांच्या कर्जाची जी धोकादायक परिस्थिती दर्शवलेली आहे ती भयावह आहे. आजच्या घडीला २०१४ यावर्षी देशावर असलेले साडे सतरा लाख कोटींचे कर्ज आता ६० लाख कोटींवर गेलेले आहे. २०२३च्या नंतरचा अहवाल महालेखा परीक्षकांनी सादर केलेला नाही. त्यानंतर सगळ्यांनीच पैसे उधळलेले आहेत की नाहीत याबाबत कोणतीही माहिती दिलेली नाही. त्यामुळे २०२३ नंतर कोणत्याही राज्याचे कर्ज कमी झाले असेल असे अजिबात वाटत नाही. आता या कर्जाचे कारण काय तर, प्रत्येक सरकारला उत्पन्न नसतानाही आपल्या जनतेसाठी उदार होऊन काही दाने टाकून मतदारांना आपल्याकडे वळवायचे असते. त्यामुळे त्यांना नवीन योजनांसह अनुदाने जाहीर करावी लागतात. जसे तुम्ही हजार देता ना, मग आम्ही पंधराशे देऊ, त्यानंतर २१०० पर्यंत वाढवू. तुम्ही पाणी फुकट देता आम्ही पाणी फुकट देऊ, वीज फुकट देता मग आम्ही पण वीज फुकट देऊ, महिलांसाठी आमच्याकडे अर्ध्या दरात म्हणजे प्रवास फुकटच केलेला आहे आणि त्यासोबत आणखीही वाटेलते फुकट देऊ, फक्त आम्हाला मते द्या. हा हिशेब कर्जाला कारणीभूत आहे की नाही हे आम्हाला अजिबात माहीत नाही. आपल्या देशामध्ये पूर्वी जकात होती. आणि इतर अनेक कर होते. त्यामुळे राज्यांना थेट उत्पन्न मिळत होते. मात्र त्यानंतर आपल्या देशात सर्व पक्षांच्या समन्वयामुळे जीएसटी सुरू झाल्यावर आता राज्याचे उत्पन्न कमी झालेले आहे. त्यामुळेच सध्याच्या जीएसटी धोरणानुसार राज्यांना केंद्राच्या मेहरबानीवर विसंबून राहावे लागते. केंद्र सरकार तर आवडते राज्य असल्यावरही हवी तेवढी मदत करीत नाही. मग नावडत्या राज्यांची तर बातच सोडा. अशा इतर अनेक योजना आपल्या डोक्यावर बसवल्यामुळे भारतातील अर्ध्यापेक्षा जास्त राज्ये कर्जाच्या जाळ्यात अक्षरशा पाण्यातून बाहेर मासा काढल्याप्रमाणे फडफडत आहेत. महाराष्ट्राला अजूनही ३० टक्क्यांच्या वर जाण्यासाठी मुभा आहे. म्हणजे आपण महाराष्ट्र राज्य म्हणून आणखी चार ते पाच लाख कोटी कर्ज घेऊ शकतो. लाडक्या बहिणींसाठी चाळीस-पन्नास हजार कोटी घेतले असेल, तर आपल्याच महाराष्ट्रातील भावांसाठी ६० ते ७० हजार कोटी कर्ज घेण्यास काय हरकत आहे. आपल्याला शेतकऱ्यांवरील कर्ज माफ करायचे आहे, अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांना मदत द्यायची आहे, महिलांना बसमधून फुकट पाठवायचे आहे. तसेच नव्या सरकारी कर्मचाऱ्यांना जुने निवृत्ती वेतन पाहिजे आहे. त्याशिवाय काही कुटुंबांचे उत्पन्न वाढवण्याकरता व्यवसायासाठी अनेक कुटुंबांना पाच ते ५० हजार रुपये कर्ज दिलेच पाहिजे. मात्र हे सर्व कर्ज काढून करणे भाग आहे. कारण प्रत्येक राज्य सरकार उत्पन्नाच्या बाबतीत झिरो झालेले आहे आणि खर्चासाठी हिरो झालेले आहे, अशीच एकूण सध्याची परिस्थिती आहे. आपले पंतप्रधान जेव्हा नवेनवे पदासीन झाले तेव्हा त्यांनी या रेवडी संस्कृतीवर जबरदस्त टीका केलेली होती. परंतु एक गोष्ट खरीच आहे ती म्हणजे गरिबांना दरमहा पाच किलो धान्य देणे म्हणजे रेवडी संस्कृती नाही, असे आपण समजावे. आपल्या देशात लहान मोठ्या किती रेवड्या आहेत, याची चौकशी करून एखाद्याने अभ्यास अहवालासह डॉक्टरेट मिळवली. तर त्याचा सत्कार करण्यासाठीही संबंधित सरकारला कर्जच काढावे लागेल का? असेही प्रश्न मनात आले आहेत. ते काहीही असले तरी महाराष्ट्रात किंवा देशात कर्जाशिवाय घर नाही आणि आम्ही सगळे बिनधास्त आहोत, कारण आम्हाला डर नाही.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## हैदराबाद गॅझेटियर लागू करण्याचा
# मार्ग अखेर मोकळा!

### आव्हान याचिकांवर सुनावणी घेण्यास हायकोर्टाचा नकार

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २२ :** मुंबई उच्च न्यायालयाने सोमवारी एका प्रकरणात सुनावणी करताना सरकारच्या हैदराबाद गॅझेटियर लागू करण्याच्या शासन निर्णयाला आव्हान देणाऱ्या रिट याचिकांवर सुनावणी घेण्यास नकार दिला.



यामुळे हे गॅझिटेयर लागू होऊन मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्राच्या माध्यमातून ओबीसी आरक्षण मिळण्याचा मार्ग अधिक सुलभ झाला आहे. या निर्णयाचा राज्यातील लाखो नागरिकांना फायदा होणार आहे.

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी मुंबईच्या आझाद मैदानावर आंदोलन केले होते. त्यानंतर राज्य सरकारने मराठवाड्यातील मराठा समाजाला कुणबी आरक्षण देण्यासाठी एक शासन निर्णय अर्थात जीआर जारी केला होता.

या जीआरला कुणबी सेना, महाराष्ट्र माळी समाज महासंघ, अहिर सुवर्णकार समाज संस्था, महाराष्ट्र नाभिक महामंडळ व सदानंद मंडलिक यांनी कोर्टात आव्हान दिले होते. त्यांनी यासंबंधी कोर्टात रिट याचिका दाखल केल्या होत्या. त्यात राज्य सरकारने २ सप्टेंबर रोजी काढलेला जीआर घटनाबाह्य असून, तो रद्द करावा किंवा त्यात योग्य ती सुधारणा करावी, अशी मागणी करण्यात आली होती.

या सर्वच याचिका सोमवारी न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे व न्यायमूर्ती संदेश पाटील यांच्या खंडपीठापुढे सुनावणीसाठी आल्या. पण कोर्टाने तांत्रिक कारणांमुळे त्यावर सुनावणी घेण्यास नकार दिला.

खंडपीठाने या याचिकांवरील सुनावणीपासून स्वतःला का दूर ठेवले? हे अजून स्पष्ट झाले नाही. तथापि, कोर्टानेही यासंबंधी अशी एखादी टिप्पणी केली नाही. पण तूर्त यामुळे हैदराबाद गॅझेटियर लागू करण्याचा मार्ग मोकळा झाल्याचे मानले जात आहे. आता ही याचिका मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर यांच्यापुढे लवकरच सादर केली जाण्याची शक्यता आहे.

## १० कोटीचे बक्षीस असलेल्या दोन नक्षल्यांना कंठस्नान

**■ महासागर प्रतिनिधी गडचिरोली, दि. २२ :** महाराष्ट्र सीमेपासून दहा किमी अंतरावर असलेल्या छत्तीसगडमधील नारायणपूर जिल्ह्यातील अबुजमाडच्या जंगलात सोमवारी सकाळी झालेल्या चकमकीत नक्षलवाद्यांच्या दोन केंद्रीय समिती सदस्यांना ठार करण्यात सुरक्षा दलाला यश आले आहे.

कादरी सत्यनारायण उर्फ कोसा (६७), कट्टा रामचंद्र रेड्डी उर्फ विकल्प उर्फ राजू दादा (६१) असे ठार झालेल्या नक्षल नेत्यांचे नाव असून दोघांवर विविध राज्यात एकुण दहा कोटींचे बक्षीस होते. महिनाभरात चार केंद्रीय समिती सदस्य ठार झाल्याने नक्षलवाद्यांना मोठा धक्का बसला आहे.

गोपनीय माहितीच्या आधारे सुरक्षा दलांनी नारायणपूर-गडचिरोली लगतच्या अबुजमाडच्या सीमावर्ती परिसरात नक्षलविरोधी मोहीम राबवली होती. दरम्यान दबा धरून बसलेल्या नक्षलवाद्यांनी जवानांच्या दिशेने गोळीबार सुरु केला. जवानांनीही जोरदार प्रत्युत्तर दिले. दोन्ही बाजूंनी काही तास चकमक चालली. अखेरीस सुरक्षा दलांना निर्णायक यश मिळाले.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, कोसा हा नक्षल चळवळीतील अत्यंत महत्त्वाचा नेता होता. केंद्रीय समितीत त्याचा मोठा प्रभाव होता. तर विकल्प हा देखील महत्वाचा नेता होता. नक्षल चळवळीत प्रवक्तेपदासह महत्वाची जबाबदारी त्याच्याकडे होती.

कारवाईनंतर घटनास्थळावरून दोघांच्या मृतदेहासह मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा, स्फोटके, साहित्य आणि नक्षलवादी प्रचारसाहित्य जप्त करण्यात आले. यामध्ये एके-४७ सारखी अत्याधुनिक बंदूकचा समावेश आहे.

पोलिसांच्या मते, जप्त केलेला साठा आगामी हिंसक कारवायांसाठी वापरला जाणार होता. मागील काही दिवसांपासून कोसा आणि विकल्प हे साथीदारांसह या परिसरात लपून बसले होते. दहा दिवसांपूर्वी गडचिरोली पोलिसांनी केलेल्या कारवाईत ते थोडक्यात बचावले होते.

सप्टेंबर महिन्यात सुरक्षा दलाला नक्षलवाद्यांच्या चार केंद्रीय समिती सदस्यांना ठार करण्यात यश आले आहे. सोमवारी ठार झालेले कादरी सत्यनारायण उर्फ कोसा (६७) हा तेलंगणातील थाडूर सिरसिला जिल्ह्यातील रहिवासी असून त्याची पत्नी राधक्का ही देखील नक्षल कमांडर होती. कोसा हा काम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडियाच्या (माओवादी) महासचिव पदाचा प्रमुख दावेदार होता.

तर तेलंगणातील करीमनगर जिल्ह्यातील रहिवासी वकिलीचे शिक्षण घेतलेला कट्टा रामचंद्र रेड्डी उर्फ विकल्प उर्फ राजू दादा (६१) हा नक्षल चळवळीत महत्वाचा नेता होता. विकल्प नावाने तो नक्षल चळवळीशी संबंधित प्रसिद्धी पत्रक काढायचा. त्याची पत्नी मालती उर्फ शांतीप्रियाला छत्तीसगडमधील रायपूर येथे अटक करण्यात आली होती.

याच महिन्यात छत्तीसगडमधील गरियाबंद येथे झालेल्या चकमकीत केंद्रीय समिती सदस्य मनोज ठार झाला होता. केंद्रीय समिती सदस्य तथा सर्वोच्च महिला नक्षल नेता सुजाता हिने तेलंगणात आत्मसमर्पण केले. केंद्रीय समिती सदस्य सहादेव सोरेन झारखंडमध्ये ठार झाला. सोमवारी आणखी दोन केंद्रीय समिती सदस्य ठार झाल्याने नक्षल चळवळीला मोठा धक्का बसल्याचे बोलले जात आहे. वर्षभरात सुरक्षा दलांनी २५० नक्षलवाद्यांना ठार केले आहे.

## ठाकरे बंधूंचा ६०:४० चा फॉर्म्युला?

**■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २२ :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे व राज ठाकरे यांच्या नेतृत्वातील मनसेत जागावाटपाचा फॉर्म्युला ठरल्याचे वृत्त आहे.



अनेक इंग्रजी, हिंदी व मराठी माध्यमांनी यासंबंधीचे वृत्त दिले आहे. या वृत्तानुसार, हे दोन्ही पक्षांमध्ये जागावाटपाचा ६०:४० फॉर्म्युला ठरला आहे. यासंबंधीची औपचारिक घोषणा लवकरच केली जाण्याची शक्यता आहे.

राज व उद्धव ठाकरे हे मराठीच्या मुद्यावर एकत्र आलेत. पण आता ते राजकारणाच्या आखाड्यातही एकत्र येण्याची शक्यता आहे. मराठीच्या मुद्यावर एका व्यासपीठावर आल्यानंतर या दोन्ही भावांतील राजकीय कटूता दूर झाली आहे. राजकीयदृष्ट्या हे दोन्ही भाऊ एकत्र आल्याची आता केवळ औपचारिक घोषणा बाकी असल्याचे मानले जात आहे. त्यातच आता मनसे व ठाकरे गटातील जागावाटपाचा फॉर्म्युला ठरल्याचे वृत्तही समोर आले आहे. या फॉर्म्युलानुसार मुंबई महापालिकेत ठाकरे गट १४७, तर मनसे ८० जागांवर निवडणूक लढवेल.

अनेक माध्यमांनी सूत्रांचा दाखला देत यासंबंधी म्हटले आहे की, ठाकरे गट व मनसेच्या युतीची अधिकृत घोषणा अद्याप झाली नाही. पण याविषयी दोन्ही भाऊ सकारात्मक आहेत. त्याचेच संकेत दोन्ही पक्षांतील नेत्यांमधून मिळत आहेत. दसरा - दिवाळीच्या आसपास हे दोन्ही पक्ष आपल्या युतीची घोषणा करतील. त्यात दोन्ही पक्षांची ताकद व वस्तुस्थिती लक्षात घेऊन जागावाटप केले जाईल.

## काँग्रेसचे ईशान्येकडे दुर्लक्ष

**■ वृत्तसंस्था, इटानगर, दि. २२ :** पंतप्रधान मोदी सोमवारी अरुणाचल प्रदेश आणि त्रिपुराच्या दौऱ्यावर होते. ते प्रथम इटानगरला पोहोचले, जिथे त्यांनी ५,१०० कोटी रुपयांच्या नवीन प्रकल्पांची पायाभरणी केली.



ते म्हणाले, काँग्रेसने अरुणाचल प्रदेशकडे दुर्लक्ष केले. आपला संपूर्ण ईशान्येकडील भाग वगळण्यात आला. जेव्हा मला सेवा करण्याची संधी देण्यात आली तेव्हा मी देशाला काँग्रेसच्या विचारसरणीपासून मुक्त केले. या राज्यात आमची प्रेरणा राष्ट्र प्रथमची भावना आहे.

ते म्हणाले, मोदी अशा लोकांची पूजा करतात ज्यांना कोणी विचारले नाही. म्हणूनच काँग्रेस पक्षाने विसरलेले ईशान्य २०१४ नंतर विकासासाठी प्राधान्य बनले आहे. आम्ही शेवटच्या मैलापर्यंतच्या कनेक्टिव्हिटीला आमच्या सरकारचे वैशिष्ट्य बनवले आहे. आम्ही येथील आठ राज्यांना अष्टलक्ष्मी मानले आहे. पंतप्रधान मोदींनी इटानगरमध्ये व्यापारी आणि व्यापाऱ्यांची भेट घेतली. तवांग मठापासून ते सुवर्ण पॅगोडापर्यंत, अरुणाचल प्रदेश शांतीचा आणि भारतमातेच्या अभिमानाचा संगम आहे. मी या पवित्र भूमीला वंदन करतो. अरुणाचल प्रदेशला विकास प्रकल्प मिळाले आहेत; राज्याला वीज कनेक्टिव्हिटी, पर्यटन आणि इतर अनेक क्षेत्रांशी संबंधित प्रकल्प मिळाले आहेत. हे भाजपच्या डबल-इंजिन सरकारच्या दुहेरी फायद्याचे उदाहरण आहे, असेही त्यांनी नमूद केले.

## पोलीस बाजूला ठेऊन मैदानात या!

### नीलेश लंकेंकडून पडळकरांना आव्हान

**■ वृत्तसंस्था, सांगली, दि. २२ :** भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांच्याविषयी बोलताना वादग्रस्त विधान केले होते. याच्या निषेधार्थ सांगलीत शरद पवार गटाकडून संस्कृती बचाव मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलताना खासदार नीलेश लंके यांनी पडळकरांना थेट इशारा दिला आहे. दम असेल तर पोलिस बाजूला ठेऊन मैदानात या. दूध का दूध, पाणी का पाणी होऊ द्या, असे आव्हान लंके यांनी पडळकरांना केले आहे.

लंके म्हणाले, याचा आका एसीत बसतो, आकालाच धडा शिकवायला हवा. एकदा पोलिस बाजूला ठेवा, दम आहे तर एकदा रणांगणात या.

## मेट्रो ४ च्या ट्रायलप्रसंगी
## फडणवीसांकडून शिंदेंचे अभिनंदन

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २२ :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत मेट्रो मार्ग ४ व ४ अ च्या टप्पा-१ प्राधान्य विभागावर तांत्रिक तपासणी व ट्रायल रनला सुरुवात एमएमआरडीए केली आहे.



ही तपासणी टप्पा-१ मधील गायमुख जंक्शन गायमुख गाव- घोडबंदर रोड- कासारवडवली- विजय गार्डन याप्रमाणे. नुकताच मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी याला हिरवा झेंडा दाखवला असून फडणवीस आणि शिंदे मेट्रोने प्रवास केला.

यादरम्यान बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले की, या महत्वाच्या मेट्रो मार्गाचे टेस्टिंग आज आम्ही करत आहोत. हा मार्ग अत्यंत महत्वाचा अजून या मेट्रोची लांबी जवळपास ३५ किलोमीटर आहे. १६ हजार कोटी याकरिता खर्च करण्यात येत आहेत. या मार्गीकेवरील जी मेट्रो असणार आहे ती, ८ डब्यांची असणार आहे. पूर्वउपनगरे, पश्चिम उपनगरे, ठाणे आणि मुंबईला जोडणारा हा महत्वाचा मार्ग होणार आहे.

फडणवीस म्हणाले की, मी विशेषः राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे अभिनंदन करेल. हा टप्पा होण्याकरिता त्यांनी विशेष प्रयत्न केले. आपल्याला मोगरपाड्याला डेपोची आवश्यकता होती आणि त्यांनी स्वतः लक्ष घालून अनेक अडचणीतून मार्ग काढत डेपोकरिता जागा मिळून दिली. आमदार सरनाईक यांनी देखील विशेष प्रयत्न केल्याचे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

५८ किलोमीटरचा हा सर्व मार्ग होणार आहे आणि देशातील हा सर्वात मोठा मेट्रो मार्ग असेल. यामुळे जवळपास २१ लाख लोक प्रवास करू शकतील. यामुळे प्रवासाचा वेळ ५० टक्के कमी होणार आहे.

## अमेरिकेच्या व्हिसा शुल्क वाढीनंतर चीनचा के - व्हिसा

**■ वृत्तसंस्था, बीजिंग, दि. २२ :** जगभरातील प्रतिभा आकर्षित करण्यासाठी चीनने के-व्हिसा सुरू करण्याची घोषणा केली आहे. अमेरिकेच्या एच-१बी व्हिसाला पर्याय म्हणून त्याचे वर्णन केले जात आहे. हा नवीन व्हिसा १ ऑक्टोबर २०२५ पासून लागू होईल.



साउथ चायना मॉर्निंग पोस्टच्या मते, के-व्हिसा हा तरुण आणि कुशल व्यावसायिकांसाठी आहे. जे एसटीईएम (विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, गणित) क्षेत्रात गुंतलेले आहेत आणि ज्यांनी एखाद्या प्रसिद्ध विद्यापीठातून किंवा संशोधन संस्थेतून शिक्षण पूर्ण केले आहे किंवा सध्या तिथे शिक्षण घेत आहेत किंवा संशोधन करत आहेत.

चीनचे पंतप्रधान ली केकियांग यांनी गेल्या महिन्यात परदेशी तरुणांच्या देशात प्रवेश आणि निर्गमनाच्या नियमांमध्ये सुधारणा करण्याचे आदेश दिले होते.त यांनी गेल्या महिन्यात परदेशी तरुणांच्या देशात प्रवेश आणि निर्गमनाच्या नियमांमध्ये सुधारणा करण्याचे आदेश दिले होते.

## खासगी शिकवणी वर्गातील विद्यार्थिनीचे शोषण
# गर्भवती विद्यार्थिनीचा मृत्यू

### आरोपी शिक्षकाला ठाकेल्या बेड्या

**■ महासागर प्रतिनिधी यवतमाळ, दि. २२ :** खासगी शिकवणी क्लासेसच्या शिक्षकाने वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थिनीला जाळ्यात ओढून तिचे लैंगिक शोषण केले. विद्यार्थीनी गर्भवती असल्याचे लक्षात आल्यानंतर त्याने दुसरीकडे तिला उपचारासाठी नेले. मात्र, उपचारादरम्यान या विद्यार्थिनीचा मृत्यू झाला. ही खळबळजनक घटना ढाणकी येथे घडली असून, पोलिसांनी आरोपी शिक्षकाला बेड्या ठोकल्या आहेत.



संदेश गुंडेकर (वय २७) असे या आरोपी शिक्षकाचे नाव आहे. ढाणकीतील गुंडेकर या खासगी शिकवणी वर्गातील शिक्षक संदेश गुंडेकर याने आपल्याच विद्यार्थिनीशी जवळीक साधून मैत्री केली. तिला आपल्या जाळ्यात अडकवले. नंतर तो वर्गातच वारंवार शारीरिक संबंध प्रस्थपित करू लागला. त्यातूनच ती गर्भवती राहिल्याची चर्चा बाहेर आली. पिडीत विद्यार्थिनीने बिटरगाव पोलीस स्टेशनला तक्रार केल्यानंतर पोलिसांनी आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद केला आहे.

या दरम्यान पिडीत मुलीवर वैद्यकीय उपचार सुरु असतानाच, नांदेड येथील शासकीय हॉस्पिटलमध्ये तिचा मृत्यू झाल्याने ढाणकी व यवतमाळ जिल्ह्यात प्रचंड खळबळ उडाली आहे.

सदर गुन्ह्यात आरोपीला भोकर येथून पोलिसांनी ताब्यात घेऊन दुहेरी गुन्हयात अटक केली. या घटनेने परिसरातील नागरिकांमध्ये संताप पसरला आहे. पुढील तपास ठाणेदार पांडुरंग शिंदे यांचे मार्गदर्शनात उपनिरीक्षक सागर अन्नमावर, कॉं. रावसाहेब मस्के करत आहेत.

## कोंबड बाजारावरच्या धाडीत ९२ जणांना अटक

**■ महासागर प्रतिनिधी गडचिरोली, दि. २२ :** उपविभाग गडचिरोली अंतर्गत पोस्टे रेगडी हद्दतील गरंजीटोला येथे अवैध कोंबड बाजारावर गडचिरोली पोलिसांनी धाड टाकून ९२ जणांना अटक केली. घटनास्थळावरून ४६ दुचाकी, ५ चारचाकी वाहनासह एकूण ४४ लाख २६ हजार ४०० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.





९२ आरोपींवर पोस्टे रेगडी येथे गुन्हा नोंद करण्यात आला असून, पुढील तपास पोस्टे रेगडीचे पोउपनि कुणाल इंगळे हे करीत आहेत. सदर कारवाई पोलीस अधीक्षक नीलोत्पल, अपर पोलीस अधीक्षक (अभियान) एम. रमेश, अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन) गडचिरोली गोकुल राज जी. यांच्या मार्गदर्शनाखाली धानोराचे सहाय्यक पोलीस अधीक्षक अनिकेत हिरडे, विशेष अभियान पथकाचे सपोनि विश्वास बागल, पीसआय ज्ञानेश्वर धुमाळ, पोउपनि देवाजी कोवासे व अंमलदार यांनी पार पाडली.

### ४४.२६ लाखांचा माल जप्त

# मोठा धमाका होणार

## एक आठवडाभर थांबा : अंजली दमानिया



**मुंबई:** राजकीय वतुर्ळात नव्या गदारोळाला सुरुवात होण्याची चिन्हं स्पष्ट दिसत आहेत. स्वतःला नेहमीच थेट बोलणारी आणि भ्रष्टाचारविरोधी भूमिकेत ठाम उभी राहणारी अंजली दमानिया यांनी अचानक केलेल्या घोषणेनं विरोधकांची उत्सुकता ताणली आहे. मोठा धमाका होणार आहे, पण त्यासाठी एक आठवडाभर थांबा, असे स्पष्ट सांगून त्यांनी वातावरण पेटवले आहे. गेल्या काही दिवसांत रोहित पवार आणि सुषमा अंधारे यांनी अंजली दमानियांवर टीका करताना, त्या फक्त विरोधी पक्षांनाच लक्ष्य करतात; मात्र भाजपवर कधीच बोलत नाहीत, असा सवाल उपस्थित केला होता. त्यामुळे त्यांच्या या वक्तव्यामुळे आता राजकीय वतुर्ळात कुजबुज सुरू झाली आहे. नेमका हा धमाका कोणत्या पक्षाच्या किंवा नेत्याच्या विरोधात होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. अंजली दमानिया यांनी सध्या आपण अतिशय गंभीर आणि महत्त्वाच्या विषयावर काम करत असल्याचे स्पष्ट केले आहे. मी सर्व प्रश्नांची उत्तरे देईन, मात्र त्यासाठी तुम्हाला थोडा संयम दाखवावा लागेल. कारण माझ्याकडे वेळ खूप कमी आहे. पण योग्य वेळी मी सर्व गोष्टींचा खुलासा करीन, असे त्या म्हणाल्या.

## शिवाजी पार्कवरही मराठी माणूस उरला नाही

# महेश मांजरेकरांनी व्यक्त केली खंत



**मुंबई :** महाराष्ट्राची राजधानी मुंबईत मराठी भाषिकांची संख्या कमी होत असल्याच्या मुद्द्यावर पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे. राजकीय वतुर्ळात यावर अनेकदा वाद-विवाद होतात. अशातच, ज्येष्ठ अभिनेते महेश मांजरेकर यांनी एका कार्यक्रमात आपली खंत व्यक्त करत मुंबईतील मराठी माणसांचा टक्का कमी होत असल्याकडे लक्ष वेधले. काही महिन्यांपूर्वी राज्यातील शाळांमध्ये लागू करण्यात आलेल्या त्रि-सूत्रीय भाषा धोरणावरून राजकीय वाद निर्माण झाला होता. त्यावेळी मनसे आणि शिवसेनेने या धोरणाला विरोध करत मराठीचा मुद्दा उचलून धरला होता. यावर सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांनी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा मुद्दा उपस्थित केल्याचा आरोप केला होता. मांजरेकरांनी व्यक्त केलेल्या या खंतीमुळे मुंबईतील लोकसंख्येच्या रचनेवर पुन्हा एकदा लक्ष केंद्रित झाले आहे.

# जीएसटी घट हा मूर्ख बनवण्याचा धंदा : संजय राऊत



**मुंबई :** केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने वस्तू व सेवा कर अर्थात जीएसटीत सवलत देण्याची घोषणा केल्यानंतर आजपासून अनेक जीवनावश्यक वस्तूंचे दर कमी झालेत. यामुळे बाजारात काहीशी स्वस्ताई आली असताना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी यावरून थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधला आहे. जीएसटीचे नवीन दर हे लोकांना मूर्ख बनवण्याचे धंदे आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी रात्री 8 चा भारत - पाक क्रिकेट सामना पाहण्यासाठी सायंकाळी 5 वाजता यासंबंधीची घोषणा केली, असे ते म्हणालेत. आजपासून देशभरात जीएसटीचे नवे दर लागू झालेत. केंद्राच्या निर्णयानुसार, पूर्वी जीएसटीचे 4 स्लॅब होते. त्यातील 2 स्लॅब रद्द करून सरकारने आता फक्त 18 व 5 टक्के हे दोनच स्लॅब कायम ठेवलेत. त्यामुळे अनेक वस्तू स्वस्त झाल्यात. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी सायंकाळी 5 वा. यासंबंधीची अधिकृत घोषणा केली.

# ठाकरे ब्रँड नाही, विचार आहे

## संदीप देशपांडे यांचा भाजपवर पलटवार



**मुंबई :** राजकीय व्यासपीठावर सध्या ब्रँड विरुद्ध विचार हा वाद रंगताना दिसत आहे. नुकताच भाजपकडून ठाकरे हा ब्रँड नाही तर बँड आहे असा घणाघात केला गेला. यावर मनसे नेते संदीप देशपांडे यांनी थेट प्रत्युत्तर देत भाजपवर हल्लाबोल केला आहे. देशपांडे म्हणाले की, ब्रँड हा व्यापाऱ्यांच्या पैशातून उभा राहतो. पण विचार हा संघषार्तून उभ्या झालेल्या चळवळीमधून जन्म घेतो. पैशाच्या बळावर ब्रँड विकला जाऊ शकतो, परंतु चळवळ पैशाने विकत घेता येत नाही. राजकारणात ब्रँड पॉलिटिक्स हा नवा ट्रेंड झाला असताना देशपांडे यांनी ठाकरे घराण्याला विचार म्हणून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. पैसे संपले की ब्रँड संपतो, पण विचार नाही, अशी आक्रमक भूमिका घेत त्यांनी ठाकरे नावाला संघषार्तून उभा राहिलेला ठाम विचार ठरवले आहे.

# माहिती तंत्रज्ञान विभागाचे सक्षमीकरण करणार

## मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली माहिती तंत्रज्ञान विभागाची आढावा बैठक



■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २२ :**

सामान्य प्रशासन विभागात माहिती तंत्रज्ञान हा महत्वाचा विभाग आहे. राज्य शासनाच्या विविध विभागाच्या सेवा या विभागामार्फत नागरिकांना पुरविल्या जातात. त्यामुळे आता माहिती तंत्रज्ञान विभागाचे सक्षमीकरण करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली माहिती तंत्रज्ञान विभागाची आढावा बैठक झाली. या बैठकीस मुख्य सचिव राजेशकुमार, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही.राधा, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रधान सचिव पराग जैन तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

राज्यातील माहिती तंत्रज्ञान विभागाचे सक्षमीकरण करून डिजिटल महाराष्ट्राची संकल्पना प्रत्यक्षात आणण्याचा शासनाचा निर्धार आहे. शासनाच्या सर्व सेवांना डिजिटल स्वरूपात उपलब्ध करून देणे, कृत्रिम बुद्धिमत्ता, बिग डेटा आणि सायबर सुरक्षा यांसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवणे हे शासनाचे प्राधान्य असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

## भाजपचे माजी नगरसेवक जगदीश पाटील

# गोळीबार प्रकरणी जेरबंद

■ **महासागर प्रतिनिधी, नाशिक, दि. २२ :**

पंचवटीतील फुलेनगरातील सागर जाधव याच्यावर झालेल्या गोळीबार प्रकरणात भाजपचे माजी नगरसेवक जगदीश पाटील यांचा सहभाग पोलिस तपासात निष्पन्न झाल्याने रविवारी (दि. २१) दुपारी त्यांना अटक करण्यात आली. पाटील यांच्या निवासस्थानावरूनच त्यांना ताब्यात घेण्यात आले. गेल्याच आठवड्यात धोत्रे खून प्रकरणात माजी नगरसेवक उद्धव निमसेंच्या अटकेनंतर भाजपचा दुसरा माजी नगरसेवक गंभीर गुन्ह्यात अटक झाल्याने गुन्ह्याशी संबंधित राजकीय मंडळींचे धाबे दणाणले आहे.

सराईत गुन्हेगार किरण निकम याचा ८ वर्षांपूर्वी झालेल्या खुनाचा बदला घेण्याकरता पगारे, उघाडे टोळीचा सदस्य असलेल्या सागर जाधवच्या मागावर असलेल्या निकम टोळीने १७ सप्टेंबरला रात्री १२ वाजता प्राणघातक हल्ला केला होता. या प्रकरणात पोलिसांनी १३ आरोपी निष्पन्न करीत ११ जणांना अटक केली. वैद्यकीय तपासणीनंतर पोलिसांनी पाटील यांची चौकशी केली. गुन्ह्यातील सहभाग निष्पन्न झाल्याने अटक केली. सोमवारी (दि. २२) त्यांना न्यायालयात हजर केले जाणार असून पोलिसांकडून ८ दिवसांच्या पोलिस कोठडीची मागणी केली जाणार आहे. न्यायालयाकडून पोलिस कोठडी मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

विधानसभा निवडणुकीत जगदीश पाटील यांनी भाजप उमेदवाराविरोधात राष्ट्रवादीच्या उमेदवाराचे उघड काम केल्याचा आरोप झाला होता. याबाबत संघ परिवारासह पक्षश्रेष्ठींनी पाटील यांच्या विरोधात कारवाई करण्याचा अहवाल प्रदेशाला दिला होता. गोळीबार प्रकरणात पाटील यांचा सहभाग असल्याचे निष्पन्न होताच पक्षाचे नेते त्यांच्यापासून दोन हात दूर राहिले. विशेष म्हणजे, मंत्री महाजन नाशिक दौऱ्यावर असतानाच ही कारवाई झाल्याने पोलिसांच्या कामगिरीवर सर्व पक्षांकडून समाधान व्यक्त केले जात आहे.

# पूर परिस्थितीमुळे अडकलेल्या नागरिकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करावे

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निर्देश



■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २२ :**

धाराशिव जिल्ह्यात परंडा तालुक्यातील साकत येथे मुसळधार पावसामुळे पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. गावामध्ये पाणी शिरले आहे. पूर परिस्थितीमुळे साकत गावाचा संपर्क तुटला असून तिथे १२ नागरिक अडकले आहेत. त्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सकाळी धाराशिवचे जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांना दूरध्वनी वरुन साकत गावात अडकलेल्या नागरिकांना बाहेर काढून सुरक्षित ठिकाणी हलवण्याचे निर्देश दिले आहेत.

साकत गावातील नागरिकांना सुरक्षित ठिकाणी नेण्यासाठी एनडीआरएफचे पथक पाठवावे तसेच हेलिकॉप्टरचीही व्यवस्था करावी, अशा सूचनाही उपमुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत. संकट काळात राज्य शासन नागरिकांच्या पाठीशी ठामपणे उभे

राज्यातील अनेक जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर राज्य शासन लक्ष ठेवून आहे. जिल्हा प्रशासन, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांनी सतर्क रहावे. पूरस्थितीमुळे धोक्यातील नागरिकांना सुरक्षित स्थळी स्थलांतरित करावे, बचाव व मदत करण्यासाठी आणि एसडीआरएफच्या पथकांना सज्ज ठेवावे,अशा सूचनाही त्यांनी दिल्या आहेत. या संकटाच्या काळात राज्य शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे, नुकसान झालेल्या नागरिकांसोबत आहे. त्यांना आवश्यक ती सर्व मदत करण्यात येईल, असा विश्वासही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी दिला.

# नवरात्र उत्सवात वाहतुकीत मोठा बदल

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २२ :**

पुणेकरांच्या नवरात्र उत्सवाची रंगत यंदा अधिक वाढणार असली तरी, वाहनचालकांना यंदा थोडी कसरत करावी लागणार आहे. शहरातील प्रमुख देवी मंदिरांमध्ये भाविकांची लाखोंची गर्दी अपेक्षित असून पोलिसांनी आगाऊ नियोजन केले आहे. मात्र या नियोजनाचा थेट परिणाम तुमच्या रोजच्या रस्त्यावर दिसणार आहे.

नवरात्र काळात पुण्यातील काही महत्त्वाचे मार्ग तात्पुरते बंद राहणार तर काही ठिकाणी वाहतूक एकेरी करण्यात आली आहे. त्यामुळे रोजचा रस्ता वापरणाऱ्या पुणेकरांना आता पयार्यी मार्गांचा आधार घ्यावा लागणार आहे.

विशेषतः अप्पा बळवंत चौक ते बुधवार चौक हा रस्ता भाविकांच्या सुरक्षेसाठी पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहे. उलट दिशेने म्हणजे बुधवार चौक ते अप्पा बळवंत चौक हा मार्ग एकेरी वाहतुकीसाठी खुला असेल. वाहनचालकांनी गाडगीळ पुतळा मार्गे शिवाजी रस्त्याचा पर्यायी मार्ग वापरण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# २६ ते २८ सप्टेंबर दरम्यान राज्यात पावसात वाढ होण्याची शक्यता

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २२ :**

24 सप्टेंबरला बंगालच्या उपसागरावर एक कमी दाबाचा पट्टा निर्माण होणार असून 28 तारखेपर्यंत तो राज्यात येण्याची शक्यता आहे. या कमी दाबाच्या पट्ट्याच्या प्रभावामुळे राज्यातील विविध भागांमध्ये 26 ते 28 सप्टेंबर दरम्यान ढगाळ हवामान आणि पावसात वाढ होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

या आठवड्यात पाऊस परत सक्रिय होणार आहे, ज्यामुळे किमान 30 सप्टेंबरपर्यंत तरी राज्यातून पाऊस निरोप घेण्याची शक्यता नाही. सध्याच्या हवामानाच्या अंदाजानुसार 22 ते 25 सप्टेंबर दरम्यान राज्यातील विविध भागांमध्ये मेघ गर्जनेसह वादळी पाऊस अपेक्षित आहे, जो प्रामुख्याने दुपारनंतर पडेल. कमी दाबाच्या पट्ट्याचा प्रभाव 26 तारखेपासून जाणवण्याची शक्यता आहे. यादिवशी विदर्भ आणि मराठवाड्यातील पूर्व आणि दक्षिणेकडे असलेल्या भागांमध्ये दुपारनंतर पावसात वाढ होण्याची शक्यता आहे. 27 तारखेला विदर्भ, मराठवाडा, खानदेश, कोकण आणि मध्य महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये पावसात वाढ होऊ शकते, आणि यातील काही भागांमध्ये मुसळधार पाऊसदेखील पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. 28 तारखेला राज्यातील पश्चिम भागांमध्ये पावसाचा जोर कायम राहू शकतो. शेतकऱ्यांनी हवामानाच्या या अंदाजानुसार शेतीचे नियोजन करावे. काढणी केलेली पिके पाऊस आणि वाऱ्यापासून सुरक्षित ठेवावीत, असे आव्हान कृषी विभागाकडून करण्यात येत आहे.

अकोला, अमरावती, भंडारा जिल्ह्याला २२, २५ आणि २६ सप्टेंबर रोजी यलो अलर्ट देण्यात आला आहे. बुलढाणा जिल्ह्याला २२, २३ आणि २५, २६ सप्टेंबर रोजी यलो अलर्ट देण्यात आला आहे. यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यांना २२ ते २६ सप्टेंबर दरम्यान यलो अलर्ट देण्यात आला आहे. गोंदियाला २२, २४, २५ आणि २६ सप्टेंबर रोजी यलो अलर्ट देण्यात आला आहे. नागपूरला २२, २५ आणि २६ सप्टेंबर रोजी यलो अलर्ट देण्यात आला आहे. वर्धा आणि वाशिम जिल्ह्यांना २२, २३ आणि २५, २६ सप्टेंबर रोजी यलो अलर्ट देण्यात आला आहे.

## कलावंत निवड समितीवर नियुक्त बोगस कलावंतांना

# जिल्हाधिकारी यांनी दिला दणका

■ **महासागर प्रतिनिधी, देसाईगंज, दि. २२ :**

जेष्ठ कलावंतांना त्यांच्या उतारवयात आधार व्हावा म्हणुन शासकीय स्तरावरुन जेष्ठ कलावंत मानधन योजना सुरु केले आहे.पात्र कलावंतांची निवड करण्याकरीता जिल्हा स्तरीय समिती गठीत करून पात्र लाभार्थ्यांची निवड करून तसा प्रस्ताव शासनाना सादर करावयाचा आहे.मात्र जिल्हास्तरीय कलावंत निवड समितीचे गठण करतांना सहपालकमंत्री डॉ.आशिष जयस्वाल यांनी जिल्हाधिकारी यांना सुचवलेल्या कलावंत निवड समितीच्या सदस्यांत चक्क बोगस कलावंतांचा शिरकाव झाल्याचे आढळून येताच करण्यात आलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली असता दहा पैकी तब्बल सहा सदस्य बोगस कलावंत आढळून येताच जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी बोगस कलावंतांना बाहेरचा रस्ता दाखवत चांगलाच दणका दिला असल्याने कलाक्षेत्रात एकच खळबळ माजली आहे.

जेष्ठ कलावंतांना शासकीय स्तरावरुन वयाच्या ५० व्या वषार्पासून प्रती महिना ५ हजार रुपये मानधन देण्यात येत आहे. याकरीता शासनाने घालून दिलेल्या अटी व शर्थी नुसार सदर योजनेचा लाभ घेणारा लाभार्थी कलावंत कलाक्षेत्रात किमान १५ वर्षे काम केलेला असणे अनिवार्य असुन तसे पुरावे जोडणे बंधनकारक आहे.मात्र गडचिरोली जिल्ह्याच्या विविध भागात कलावंत मानधन योजनेत प्रती फार्म १० हजार रुपये घेऊन बनावटी व बोगस कागदपत्रे तयार करून देणारे एजंट सक्रिय असल्याची गंभीर बाब स्थानिक वृत्तपत्रांनी चव्हाट्यावर आणली होती.यात देसाईगंज तालुक्यातील दोघांचा समावेश असुन यापैकी नैनपुर येथील एकाची चक्क कलावंत निवड समितीवर नियुक्ती करण्यात आल्याची स्थानिक वृत्तपत्रांनी बातमी प्रकाशित करताच झाडिपट्टितील कलावंतांनी ही गंभीर बाब लक्षात घेता गडचिररोली जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर करून निवड समितीवरून बोगस कलावंतांची हकालपट्टी करून योग्य कलावंतांना न्याय देण्याची मागणी केली होती.

दरम्यान कलावंतांच्या शिष्टमंडळाने दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सह पालकमंत्री डॉ.आशिष जयस्वाल यांनी सुचवलेल्या १० सदस्यांच्या यादितील नावांची त्या-त्या भागातील पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांनी चौकशी केली असता दोन सदस्यांनी चक्क आपण कलावंत नसल्याने आपले नाव कमी करण्यात यावे तर चार कलावंतांची पडताळणी करण्यात आली असता ते कलावंत असल्याचे कुठलेही पुरावे त्यांचेकडे आढळून आले नाहित. त्यामुळे जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी शिफारस केलेल्या १० पैकी ६ बोगस कलावंतांना निवड समितीतून वगळण्याची कारवाई केली असली तरी अशा बोगस कलावंतांची पालकमंत्र्यांकडे शिफारस करणारे कोण? यामागे त्यांचा हेतु काय? असा प्रश्न आता उपस्थित केल्या जाऊ लागला आहे. मानधन योजनेत बोगस कलावंत अद्यापही कायम

सद्यस्थितीत शासकीय स्तरावरुन देण्यात येत असलेल्या जेष्ठ कलावंत मानधन योजनेचा मोठ्या प्रमाणात कलावंतांना लाभ देण्यात येत आहे.मात्र लाभ घेत असलेल्या अनेक कलावंतांच्या सादर केलेल्या फायलींची पडताळणी करण्यात आली असता अनेक कलावंतांकडे झाडिपट्टी नाट्य संमेलनाचे प्रमाणपत्र जोडलेले असून सदर कलावंत हे भजणी कलावंत असल्याने त्यांचा झाडिपट्टी संमेलनाशी संबंध काय? त्यांचेकडे हे प्रमाणपत्र आले कुठुन? विशेष म्हणजे जवळपास सर्वच भजनी कलावंतांनी एकसारखेच झाडिपट्टी नाट्य संमेलन,विविध संस्थांचे एकसारखेच प्रमाणपत्र जोडले असले तरी सदर कलावंत १५ वर्षांपासून कार्यरत असल्याचे स्पष्ट होत नसतांना फायली कशा काय मंजूर करण्यात आल्या? याबाबत चौकशी करण्यात आल्यास मोठी रॅकेट उघडकीस येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

# आई राजा.. उदो उदो..

## तुळजाभवानीची मूळ सिंहासनावर चल प्रतिष्ठापना



■ **महासागर प्रतिनिधी,**
**कोल्हापूर, दि. २२ :**

महाराष्ट्रात सोमवारी मोठ्या उत्साहात नवरात्रोत्साला सुरुवात झाली. तुळजापूरमध्ये तुळजाभवानी देवीच्या मंचकी निद्रेनंतर आता तिची मूळ सिंहासनावर चल प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. कोल्हापूरची अंबाबाई, वणीची सप्तशृंगी आणि माहूर येथील देवीच्या नवरात्रोत्सवालाही आज मोठ्या उत्साहात सुरुवात झाली.

तुळजापूरनगरी शारदीय नवरात्रोत्सवासाठी आलेल्या भाविकांनी गजबजली आहे. विशेष म्हणजे या उत्सवात आज 22 सप्टेंबरपासून विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

शारदीय नवरात्रोत्सवाला आजपासून सुरुवात झाली. त्यामुळे नवरात्रोत्सवाच्या काळात 22 सप्टेंबर ते 2 ऑक्टोबर आणि 7 आणि 10 ऑक्टोबर रोजी सकाळचे चरणतीर्थ रात्री एक वाजता होणार आहे. पूजेचे घाट व अभिषेक सकाळी 6 ते 10 आणि सायंकाळी 7 तेस 9 या वेळेत होणार आहेत, असे तहसीलदार तथा व्यवस्थापक माया माने यांनी कळवले आहे. नवरात्रोत्सवात विशेष अलंकारपूजा होईल. तसेच रोज रात्री छबिना मिरवणूक निघेल. यंदा तुळजापूरमध्ये एआय कॅमेऱ्याद्वारे गर्दी नियंत्रणासह हरवलेल्या भाविकांचा शोध घेतला जाईल. तब्बल हजार वाहनांच्या पार्किंगची पाच मैदानात सोय केली असून, 2600 पोलिस, होमगार्ड तैनात करण्यात आलेत. उत्सवाच्या पहिल्या दिवशी आज सुप्रसिद्ध गायक रोहित राऊत, जुईली जोगळेकर, पद्मनाभ गायकवाड यांचा भक्तिसंगीत कार्यक्रम होतोय.

# अतिवृष्टी, पूर परिस्थितीत मदत व बचाव कार्यास सर्वोच्च प्राधान्य

## जिल्हा प्रशासनास तातडीने मदत

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २२ :**

राज्यात सध्या सुरू असलेल्या पावसामुळे निर्माण झालेल्या पूर परिस्थितीत नागरिकांच्या मदत व बचाव कायार्साठी संबंधित जिल्हा प्रशासनामार्फत सर्वोच्च प्राधान्य दिले जात आहे. अतिवृष्टी आणि पुरामुळे निर्माण होत असलेल्या परिस्थितीवर राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून लक्ष ठेवण्यात येत असून यासाठी जिल्हा प्रशासनास आवश्यक मदत व साधनसामग्री उपलब्ध करून दिली जात असल्याने नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून करण्यात आले आहे.

धाराशिव जिल्ह्यात (परांडा तालुक्यातील मौजे लाची) येथे झालेल्या पावसामुळे १२ नागरिक अडकले होते. या नागरिकांच्या मदत व बचाव कायार्साठी नाशिकवरून एअर फोर्सचे हेलिकॉप्टर रवाना करण्यात आले आहे आणि राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ) पुणे येथील एक पथक रवाना करण्यात आले आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी, शेवगाव, जामखेड, कर्जत तालुक्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे अडकलेल्या नागरिकांना सुरक्षित बाहेर काढण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ) पुणे आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ) धुळे येथील एक पथक पाठवण्यात आले आहे.

बीड जिल्ह्यात नदीला आलेल्या पुरामुळे (सिंदफना नदी परिसर) या ठिकाणच्या नागरिकांना मदत व बचाव कायार्साठी नगरपालिका बीड यांच्याकडील बोट पाठविण्यात आली. तसेच राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ) पुणे एक पथक शोध व बचाव कायार्साठी पाठवण्यात आले आहे.

सोलापूर जिल्ह्यात बार्शी तालुक्यात सिना आणि भोगावती नदीला आलेल्या पुरामुळे अडकलेल्या नागरिकांना सुरक्षित बाहेर काढण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ) चे एक पथक रवाना व नगरपालिका बार्शी अग्निशमन दलाची बोट घटनास्थळी पाठविण्यात आली आहे. तसेच सीना नदीकाठच्या सर्व नागरिकांना राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून सचेत ॲप मधून सतर्कतेचा संदेश देण्यात आला आहे.

जळगाव जिल्ह्यातील पाचोरा तालुक्यातील चार गावे पूरग्रस्त असून हिवरा नदीला पूर येण्याची शक्यता असल्याने मदत व बचाव कायार्साठी राज्य आपत्ती प्रतिसाद दलाचे पथक पाठवण्यात आले आहे. राज्यात सध्या सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे निर्माण होणाऱ्या पूर परिस्थितीत नागरिकांनी सतर्क राहावे. नदीकाठच्या व कमी उंचीच्या भागातील नागरिकांनी सुरक्षित स्थळी स्थलांतर करावे. प्रशासनास व बचाव पथकांना सहकार्य करावे. आवश्यकतेनुसार अतिरिक्त पथके व साधनसामग्री तातडीने उपलब्ध करून देण्यात येणार असल्याने नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहनही राज्य आपत्कालीन कार्य केंद्रामार्फत करण्यात आले आहे.

# पत्नीच्या त्रासामुळे तरुणाची आत्महत्या

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २२ :**

लग्नानंतर अवघ्या सहा महिन्यातच पत्नीच्या सततच्या त्रासामुळे तरुणाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना येरवडा परिसरात घडली. पोलिसांनी याबाबत तरुणाला आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या आरोपावरुन पत्नीसह तिच्या आईविरुद्ध येरवडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

अक्षय विजय साळवे (वय २६, रा. गणेशनगर, येरवडा,पुणे) असे आत्महत्या केलेल्या मयत तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी त्याची पत्नी दीपाली अक्षय साळवे (वय २४), तिची आई संगीता अशोक अडागळे (रा. भगवाननगर, गेवराई, जि. बीड) यांच्याविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत मयत अक्षय याची आई लक्ष्मी विजय साळवे (वय ५२) यांनी येरवडा पोलीस ठाण्यात आरोपी विरोधात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अक्षयचा दीपालीशी सहा महिन्यांपूर्वीच विवाह झाला होता. विवाहानंतर दीपाली आणि तिची आई संगीता यांनी अक्षयला आई-वडिलांपासून वेगळे राहण्यास वेळोवेळी सांगितले. त्याने वेगळे राहण्यासाठी त्याच्यावर सतत दबाब आणला. त्याच्याविरुद्ध येरवडा पोलीस ठाण्यात तक्रारी देखील दिल्या. पत्नी आणि सासूच्या त्रासामुळे अक्षयने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. पत्नी आणि सासूच्या त्रासामुळे मुलगा अक्षयने आत्महत्या केल्याचे त्याची आई लक्ष्मी साळवे यांनी फिर्यादीत सांगितले आहे. पोलीस उपनिरीक्षक एस दळवी पुढील तपास करत आहेत.

# विमुक्त जाती व भटक्या जमातींना आता फिरती शिधापत्रिका मिळणार




■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २२ :**

राज्यभरात फिरून आपली उपजिविका भागविणाऱ्या विमुक्त जाती व भटक्या जमातींना आता केवळ स्वयंघोषणापत्राच्या आधारे फिरती शिधापत्रिका तसेच आधारकार्ड, मतदान ओळखपत्र देण्याचा महत्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. विमुक्त जाती व भटक्या जमातीमधील सुमारे अडीच- तीन कोटी लोकांना या योजनांचा फायदा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

भटक्या जमाती पारंपरिक पद्धतीने एकाच ठिकाणी न राहता फिरत्या स्वरूपात आपला उदरनिर्वाह करत असतात. राज्यात विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवगार्ची संख्या लक्षणीय असून, यामध्ये ८५ लाख धनगर, ६५ लाख वंजारी, गोंधळी,मरागाईवाले आणि गोसावी(एनटी-बी) यांची संख्या ६० लाखाच्या आसपास तर बंजारा, बेरड, रामोशी या विमुक्त जातींमधील लोकांची संख्या ६० लाखाच्या घरात आहे. या जाती-जमातींच्या भटक्या जीवनशैलीमुळे सरकारच्या विविध योजनांचा लाभ त्यांच्यापर्यंत पोहचविणे यंत्रणांसाठी आव्हानात्मक असते.

विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या नागरिकांना त्यांचे मूलभूत अधिकार व सरकारच्या विविध योजनांचे लाभ मिळण्यासाठी आवश्यक असलेली ओळखपत्रे, शासकीय प्रमाणपत्रे व विविध योजनांचा लाभ देण्यासाठीच्या कार्यपद्धतीत सुधारणा करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असून त्याबाबतचा शासन निर्णयही निर्गमित करण्यात आल्याची माहिती उच्चपदस्थ अधिकाऱ्याने दिली.

त्यानुसार आता केवळ स्वयंघोषणापत्राच्या आधारे विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या नागरिकांना विविध ओळखपत्रे, प्रमाणपत्रे व विविध शासकीय योजनांचा लाभ देण्यात येणार आहे. यानुसार विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या नागरिकांना आधारकार्ड मिळविण्यात येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन आता ते वषार्तील काही दिवस ज्या ठिकाणी जाऊन रहिवास करतात, अशा ठिकाणी त्यांना आधारकार्ड देण्यात येणार आहे.

तसेच ज्यांचे रहिवासाचे ठिकाण निश्चित नसेल, अशा नागरिकांना त्यांचे सर्वसाधारण रहिवासाचे ठिकाण निवडण्याची अनुमती देऊन त्याठिकाणी त्यांना स्वंयभोषणापत्राच्या आधारे आधार कार्ड दिले जाणार आहे.

# पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांचा भंडारा दौरा

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा दि.२२ सप्टेंबरः** गृह,( ग्रामीण) गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार व खनिकर्म, राज्यमंत्री तथा पालकमंत्री भंडारा जिल्हा डॉ. पंकज भोयर हे मंगळवार दि. २३ सप्टेंबर २०२५ रोजी भंडारा जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. दौरा कार्यक्रम पुढील प्रमाणे आहे. २३ सप्टेंबर रोजी सकाळी ०९.३० वाजता शासकीय वाहनाने नागपूर येथून भंडाराकडे प्रयाण करतील. त्यानंतर सकाळी ११.०० वाजता भंडारा येथे आगमन व जिल्हा शिक्षक पुरस्कार व गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार कार्यक्रमास उपस्थिती : स्थळ : अखिल सभागृह, गणेशपुर भंडारा कार्यक्रमास उपस्थित राहतील. दुपारी १२.०० वाजता छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानारंतर्गत सेवा पंधरवाडा कार्यक्रमास उपस्थीती स्थळ : हेंमत सेलीब्रेशन,रॉयल पब्लीक स्कुल जवळ,नागपूर नाका भंडारा .यानंतर दुपारी २ वाजता शासकीय वाहनाने भंडारा येथून नागपूरकडे प्रयाण करतील.

## भंडाऱ्यात उद्या गुणवंत विद्यार्थी व शिक्षकांचा सन्मान

**भंडारा :** जिल्हा परिषद भंडारा व शिक्षण विभागाच्या वतीने जिल्हा शिक्षक पुरस्कार समारंभ तसेच फेब्रुवारी/मार्च २०२५ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उद्या (दि. २३ सप्टेंबर) सकाळी ११ वाजता गणेशपूर येथील अखिल सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद अध्यक्षा कविता उईके असतील. विशेष अतिथी म्हणून सर्व खासदार, सर्व आमदार तसेच जिल्हाधिकारी सावन कुमार व मुख्य कार्यकारी अधिकारी निलिंद्रकुमार राळवे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांना प्रशस्तिपत्रक देऊन गौरविण्यात येणार असून शिक्षकांना जिल्हा शिक्षक पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत.

# सभापतींची कर्मचाऱ्यांना अश्लिल शिवीगाळ

### साकोली पंचायत समितीतील प्रकार ;अधिकारी कर्मचारींतर्फे तीव्र निषेध व लेखणी बंद



**महासागर प्रतिनिधी**

**साकोली दि.२२ सप्टेंबरः** मासिक सभा संपल्यावर पंचायत समिती सभापतींनी अधिकारी व कर्मचाऱ्यांना अवांतर भाषेत अशिल शिवीगाळ करीत शासकीय कर्मचारींची मानहानी केली. त्यांनी सर्वांची जाहीर माफी मागावी. जोपर्यंत माफी मागत नाही तोपर्यंत लेखणी बंद आंदोलन सुरू ठेवण्याचा निणऱ्य घेत ( सोम. २२ सप्टें.) ला खंड विकास अधिकारी व आमदार नाना पटोले यांना निवेदन देण्यात आले. याप्रकरणी साकोलीत चांगलेच वातावरण तापलेले आहे.

शुक्रवार १९ सप्टेंबरला पंचायत समितीत मासिक सभा संपल्यावर सभापती ललित शंकर हेमने यांनी पं. स. मधील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना अवांतर भाषेत अशील शिवीगाळ करीत 'सर्व अधिकारी कर्मचारी( अशिल शब्द )आहेत, चोर आहेत. पैसे घेतल्याशिवाय कोणतेही काम करीत नाहीत, कोणीही दुधाने धुतलेले नाहीत. दारुसाठी मागेमागे येतात' अशा प्रकारच्या अशोभनिय भाषेत स्वतःचे कक्षात व कक्षाबाहेर कार्यालयाचे व्हरांड्यात मोठमोठया आवाजात ओरडून बोलत अशील व अशोभनिय भाषेत शिवीगाळ केली. याशिवाय कार्यालयातील महिला अधिकारी कर्मचारी उपस्थित असतांना सुध्दा अशील भाषेत शिवीगाळ केली. ही बाब कार्यालयीन दृष्टीने अत्यंत अशोभनिय आहे व अधिकारी कर्मचारी यांचे आत्मसन्मान खच्चीकरण करणारी आहे. सदर प्रकरणामुळे अधिकारी कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झालेला आहे.

सदर घडलेल्या घटनेचा आम्ही सर्व अधिकारी व कर्मचारी तीव्र निषेध करुन सभापती पं. स. साकोली हे जोपर्यंत घडलेल्या प्रकारावर पंचायत समिती साकोली कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांची जाहीर माफी मागत नाही तो पर्यंत दि. २२ सप्टेंबर पासून आम्ही खालील सही करणारे अधिकारी व कर्मचारी, ग्रामपंचायत अधिकारी यांनी 'लेखनी बंद' करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

असे निवेदन आमदार नाना पटोले, मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. भंडारा यांना सुद्धा देण्यात आले.

याप्रसंगी पंचायत समिती मधील सर्व कर्मचारी व अधिकारी तसेच सर्व ग्रामपंचायत अधिकारी प्रामुख्याने उपास्ति होते. व ग्रामपंचायत अधिकारी संघटनांनी सुद्धा निवेदन दिले.

या संतापजनक प्रकारामुळे जिल्हा परिषद, पंचायत समितीतील वातावरण तापले असून एक पदस्थ सभापतींना अधिकारी व कर्मचाऱ्यांना अशिल शिवीगाळ ही भाषा शोभून दिसते का.? या प्रकाराने सर्व जनतेसमोर आमचा अपमान झाला यावर तातडीने दखल घेतली नाही तर लेखणी बंद आंदोलन सुरू राहील अशी प्रतिक्रिया साकोली पंचायत समितीच्या आवारात सुरू होती.

सदर निवेदनात गटविकास अधिकारी पी. व्ही. जाधव, सहा. गटविकास अधिकारी प्रदीप समरीत, गटशिक्षणाधिकारी विजय आदमने यांसह अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# उकारा येथील बोडीत बुडून तरुणाचा मृत्यू

**महासागर प्रतिनिधी**

**साकोली दि.२२ सप्टेंबरः** सातलवाडा येथील संतोष रामचंद्र भोंडे वय २५ हा उकारा फाटा येथील बोडी मध्ये बुडून याचा रविवार दिनांक २१ सप्टेंबरला सकाळी साडेसात वाजता मृत्यू झाला. सातलवडा येथील रहिवासी असणारा संतोष रामचंद्र भोंडे हा त्याचे काका दीपक भोंडे व आकाश भोंडे यांच्या सोबत मोटर सायकलने सातलवाडावरून सकाळी सात वाजता उकारा येथे नातेवाईक असणारे संजय छगन सोनवणे यांच्याकडे आला.



संजय सोनवणे यांनी आपले बैल उकारा येथील शिवमंदिर देवस्थानच्या समोर असणाऱ्या भेलाई बोडी येथे धुण्यासाठी आणले यांच्यासोबत संतोष देखील आला होता संजय सोनवणे यांनी आपले बैल धूऊन बोडी बाहेर काढले परंतु संतोष मात्र आंघोळ करण्यासाठी बोडी मध्ये उतरला व त्याला पोहता येत नसल्याने त्याचा तोल गेल्याने तो बोडीच्या आत मध्ये गेला,ही घटना लक्षात येताच संजय सोनवणे व सोबत असणारे आकाश भोंडे व दीपक भोंडे यांना कुणालाही पोहता येत नसल्याने त्यांनी आरडाओरड करून संतोषला वाचवण्यासाठी मदतीची हाक मारली संतोष हा बोडीच्या तळाशी असणाऱ्या गाळात फसल्याने त्याला काढण्यासाठी उकारा देवस्थानचे अध्यक्ष गणेश खोटेले यांनी त्वरित पोलीस ठाणे तहसीलदार यांच्याशी संपर्क साधला तसेच उकाराचे पोलीस पाटील माणिकराव तरोणे यांनी देखील मदतीसाठी धावपळ केली साकोली नगर परिषदेचे माजी नगरसेवक मनीष कापगते, साकोली एसटी आगारातील एसटी चालक जनार्धन दोनोडे गरिबा मेश्राम सुखदेव मेश्राम सुखदेव मोहरकर कैलास मेश्राम रामकृष्ण गोटेफोडे शैलेश लांजेवार गुलाब वाघाडे उमेश लांजेवार विनोद सयाम किन्ही मोखे येथील शक्तिमान यांनी सकाळच्या आठ पासून तर सकाळी साडेदहापर्यंत बोडीमध्ये संतोषला वाचवण्याची धडपड केली.

परंतु, साडेदहा वाजता मात्र संतोषचे प्रेत हाती लागले. संतोष हा आई-वडिलांचा एकुलता एक मुलगा असून त्याला एक बहीण आहे संतोष हा अविवाहित निर्व्यसनी व अत्यंत कठोर परिश्रम घेणारा होता. ट्रॅक्टरचा ड्रायव्हर असल्याने तो आई-वडिलांचा आधार होता त्याच्या जाण्याने आजी -आजोबा आई-वडील यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# 'राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवाडा' १७ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर विशेष मोहिम आयोजन

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा दि.२२ सप्टेंबरः** 'राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवाडा दि. १७ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर २०२५ या दिनांचे औचित्य साधुन, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती भंडारा च्या वतीने दिनांक १७ सप्टेंबर ते ०२ आक्टोंबर २०२५ पर्यंत विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

त्याअनुषंगाने जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, भंडारा या कार्यालयामार्फत प्राप्त अर्जापैकी दिनांक १३.०८.२०२५ पर्यंतचे जात वैधता प्रमाणपत्र निकाली काढण्यात आलेले आहेत. तरी अर्जदारांनी त्याचे ई-मेल आयडीवरुन प्रमाणपत्र काढून घ्यावे.

सन २०२५-२६ या सत्रामध्ये अनुसूचित जाती, विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विज्ञान शाखेच्या इयत्ता १२ वी मध्ये शिकत असलेल्या व व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे अर्ज सादर करण्याकरीता सदर कालावधीत विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

करीता अशा सर्व अर्जदारांनी जाती दावा पडताळणीचे प्रस्ताव जिल्हा जात प्रमाणपंत्र पडताळणी समिती, भंडारा या कार्यालयास त्वरीत अर्ज सादर करावे. तसेच ज्या अर्जदारांनी कार्यालयास अर्ज सादर केलेला आहे परंतु त्यांचे अर्ज कार्यालयाकडे त्रुटीपुर्ततेकरीता प्रलंबित आहेत व ज्यांना अद्यापि जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झालेले नाहीत अशा अर्जदारांच्या त्रुटी पुर्ततेकरीता दिनांक २५.०९.२०२५ रोजी वेबिनारचे आयोजन करण्यात आलेले आहे.

तरी त्रुटीपुर्तता करणाऱ्या सर्व अर्जदारांनी या कालावधीमध्ये जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, भंडारा येथे संपर्क साधावा. असे आवाहन डॉ. देवसुदन धारगावे, उपायुक्त तथा सदस्य, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, भंडारा यांनी केले आहे.

# प्रहार जनशक्ती पक्ष जिल्हा सचिव पदी इंजी चारुल रामटेके यांची नियुक्ती

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा दि.२२ सप्टेंबरः** मागील ७ ते ८ वर्षापासून प्रहार जनशक्ती पक्षाशी एकनिष्ठ राहून विविध भूमिका पार पाडत पक्ष वाढीसाठी वेळ देत पक्ष मजबूती साठी कार्य केले. याच उत्कृष्ट अश्या कार्याची दखल घेत शुक्रवार दिनांक १९ सप्टेंबर रोजी प्रहार जनशक्ती पक्ष भंडारा च्या वतीने आयोजित स्नेहभोजन व कार्यकर्ता मेळाव्यात प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष मा.बच्चूभाऊ कडू यांच्या आदेशाने भंडारा जिल्हा अध्यक्ष श्री. अंकुश वंजारी यांनी प्रहार जनशक्ती पक्ष जिल्हा सचिव पदी इंजी चारुल रामटेके यांची नियुक्ती केली. त्याबद्दल



इंजी चारुल रामटेके यांनी प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष व माजी राज्यमंत्री बच्चू कडू आणि पक्षाचे भंडारा जिल्हा अध्यक्ष अंकुश वंजारी यांच्या समवेत पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे आभार मानले आहेत.

# महाराष्ट्र राज्य जंगल कामगार संघाकडून धर्मराज भलावी यांचा जाहिर सत्कार

**महासागर प्रतिनिधी**

**साकोली दि. २२ सप्टेंबरः** महाराष्ट्र राज्य जंगल कामगार सहकारी संस्था पुणे स्थित नागपूर ची वार्षिक आमसभा राज्य अध्यक्ष मान.वासुदेवशाह टेकाम यांचे अध्यक्षतेखाली व राज्य संघाचे उपाध्यक्ष मान.आम.राजेशजी पाटील, राज्य संघाचे संचालक व भंडारा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक मा.धर्मराज भलावी, राज्य संचालक दुर्गेशजी कळपती, वसंताजी सरोते, घनश्यामजी मडावी, ईळपाते,कार्यकारी संचालक राजेश कटरे, संचालिका मसराम मॅडम,अॅड. सिरसे साहेब,लेखा परिक्षक पारसे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. याप्रसंगी राज्य संघाचे संचालक मान.धर्मराज भलावी हे भंडारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक पदावर निवडून आल्याबद्दल राज्य संघाकडून त्यांचे शाल, पुष्पगुच्छ व सम्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. राज्य संघाचे वार्षिक अहवाल वाचन व उपस्थितांचे आभार कार्यकारी संचालक मान.राजेशजी कटरे यांनी मानले.सभेला महाराष्ट्र राज्य जंगल कामगार सहकारी संस्थांच्या संघाचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# इंदुबाई टाकराम कटनकार यांचे निधन

**महासागर प्रतिनिधी**

**सानगडी दि. २२ सप्टेंबरः** श्रीमती . इंदुबाई टाकराम कटनकार. वय ६२ वर्ष. राहणार लवारी अल्पसा आजापणामुळे २२/०९/२०२५ रोजी निधन झाले.

त्यांचं अंतिम संस्कार कारागोटा समशान घाट लवारी येथे करण्यात आले . त्यांचा पशाचात २ मुले २ सूना नातवंडे व बराच मोठा आप्त परिवारआहे. ऊल्हाष कटनकर दै.वृतपत्राचे एजेंट असुन यांचे मातोश्री आहेत.

# धान खरेदी विक्री केंद्र विविध सेवा सहकारी संस्था यांना देण्यात यावी : किरण अतकरी

### मार्केटिंग फाउंडेशनचे अध्यक्ष यांच्याकडे मागणी मुंबईत घेतली भेट

**महासागर प्रतिनिधी**

**जांब (लोहारा) दि.२२ सप्टेंबरः** शिवसेनेचे भंडारा गोंदिया जिल्ह्याचे लोकसभेचे समन्वय किरण अतकरी यांनी मुंबईत जाऊन मार्केटिंग फाउंडेशनचे अध्यक्ष दत्तात्रय पानसरे यांची भेट घेऊन त्यांनी धान खरेदी विक्री केंद्र विविध सेवा सहकारी संस्था यांना देण्यात यावी अशी मागणी किरण अतकरी यांनी केली आहे.

भंडारा जिल्हा हा धान उत्पादनासाठी प्रसिद्ध जिल्हा म्हणून ओळखला जातो या धान मालाची विक्री शासनाने दिलेल्या धान खरेदी केंद्रावर घेतले जातात मागील वर्षी धान खरेदी केंद्र हे सुशिक्षित बेरोजगार संस्थांना देण्यात आले होते परंतु मागील वर्षी या संस्थांनी धान खरेदी केंद्रामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार आढळून आला होता त्यामुळे कृषी औद्योगिक संघ भंडारा व कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक किरण अतकरे यांनी मार्केटिंग फाउंडेशनच्या अध्यक्ष दत्तात्रय पानसरे यांची मुंबई भेट घेऊन त्यांनी कळविले की धान खरेदी केंद्र हे गावामध्ये असलेल्या विविध कार्यकारी सेवा संस्था यांना धान खरेदी विक्री करण्याच्या अधिकार देण्यात यावे अशी मागणी त्यांनी आपल्या पत्रात केली .

मागील वर्षी झालेल्या आमसभेमध्ये एकमताने ठराव होते की बेरोजगार बहुउद्देशीय संस्थांना धान्य खरेदीचे विक्रीचे काम देण्यात येऊ नये असे सर्वानुमते सभेमध्ये ठरले होते .

परंतु अशा प्रकारचा ठराव घेऊन सुद्धा धान्य खरेदी विक्री केंद्र त्याच संस्थेला देण्यात आले. मागील वर्षी ह्या संस्थेने तान खरेदी केंद्रामध्ये फार मोठा भ्रष्टाचार झाला होता त्यामध्ये अनेक गुन्हे दाखल झाले होते आणि त्याची चौकशी सुद्धा झाली होती त्यामुळे अशा संस्थांना धान्य खरेदी विक्रीचे कार्य देण्यात येऊ नये त्याऐवजी धान्य खरेदी विक्रीची परवानगी विविध सेवा सहकारी संस्था यांना देण्यात यावी अशी मागणी किरण अतकरी यांनी केली आहे .



# तालुक्यातील अपात्र रेशन लाभार्थ्यावर कारवाई केली जाईल

### अपात्र लोकांना योजना सोडण्याचे आव्हान

**महासागर प्रतिनिधी**

**साकोली दि. २२ सप्टेंबरः** राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत, सरकार साकोली तालुक्यातील हजारो कुटुंबांना दरमहा मोफत धान्य पुरवत आहे.

या योजनेअंतर्गत, अंत्योदय योजनेअंतर्गत ८,३३४ रेशन कार्ड आणि प्रधान कुटुंब योजनेअंतर्गत १८,८९१ रेशन कार्डसह एकूण २७,२२५ रेशन कार्डधारकांना अनुदानित धान्य दुकानांमधून लाभ दिला जात आहे.

सरकारने तयार केलेली ही योजना असुरक्षित गटांसाठी अन्न सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी प्रभावी असली तरी, काही अपात्र लाभार्थी अजूनही या योजनेचा लाभ घेत आहेत. अशा लाभार्थ्यांची पडताळणी केल्यानंतर, गरजू आणि आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांपर्यंत पोहोचण्याचे या योजनेचे उद्दिष्ट आहे. त्यामुळे, सरकारी किंवा निमसरकारी नोकरीत असलेल्या, चारचाकी वाहने असलेल्या, आयकर भरणाऱ्या रेशनकार्डधारक असलेल्या किंवा ज्यांची कुटुंबे आर्थिकदृष्ट्या मजबूत आहेत अशा लाभार्थ्यांनी तहसील कार्यालय, साकोली येथे उपलब्ध असलेल्या अर्जाद्वारे तात्काळ या योजनांमधून बाहेर पडावे. अन्यथा, त्यांचे रेशनकार्ड रद्द केले जातील आणि सरकारी नियमांनुसार कारवाई केली जाईल. काही श्रीमंत व्यक्ती अजूनही या योजनेचा लाभ घेत आहेत.

हे अन्याय्य आहे आणि खरोखरच पात्र आणि गरीब कुटुंबांना वंचित ठेवते. जर अपात्र व्यक्ती स्वेच्छेने योजना सोडत असतील तर सरकार नवीन पात्र लाभार्थ्यांची नोंदणी करू शकते आणि त्यांना अन्नधान्य देऊ शकते. या प्रक्रियेत सर्वांचे सहकार्य आवश्यक आहे. साकोली तहसील कार्यालयातील पुरवठा शाखेत या संदर्भात विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. लाभार्थ्यांना काही समस्या आल्यास त्यांनी निरीक्षक अधिकारी रवींद्र उन्हडे यांच्याशी संपर्क साधावा.

'साकोली तहसीलमध्ये राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेचे लाभ मोठ्या प्रमाणात पुरवले जात आहेत. तहसीलच्या गावांमध्ये, वस्त्यांमध्ये आणि शहरी भागातील लाभार्थी कुटुंबांना अन्नधान्य सुरळीतपणे पुरवले जात आहे. तथापि, अपात्र कुटुंबांना वगळल्याने पात्र कुटुंबांचे नुकसान होत आहे.

अपात्र शिधा पत्रिकाधारकांनी सरकारच्या महत्त्वाच्या राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेचे फायदे केवळ पात्र आणि खरोखर गरजू लोकांपर्यंत पोहोचावेत यासाठी जबाबदारीने कारवाई करावी.'

**नीलेश कदम - तहसीलदार, साकोली**

**धान्य वाटप अशा प्रकारे होते**

या योजनेअंतर्गत, अंत्योदय शिधा पत्रिकाधारकांना दरमहा प्रत्येक शिधापत्रिकासाठी १० किलो गहू आणि २५ किलो तांदूळ सरकारकडून मोफत दिला जातो, तर प्राधान्य गट लाभार्थी शिधापत्रिकाधारकांना प्रति व्यक्ती १ किलो गहू आणि ४ किलो तांदूळ मोफत दिला जातो.

**मिशन सुधारणा कार्य**

मिशन सुधारणा कार्याचा भाग म्हणून जिल्ह्यात शिधापत्रिका पडताळणी सुरू आहे. त्यामुळे पुरवठा विभाग मिशन सुधारणा कार्याअंतर्गत साकोली तहसीलमध्ये अंत्योदय आणि प्राधान्य गट लाभार्थी शिधापत्रिका पडताळणीसाठी मोहीम देखील राबवत आहे.

त्यामुळे, श्रीमंत व्यक्तींनी त्यांच्यावर कोणतीही कारवाई करण्यापूर्वी तहसील कार्यालयात किंवा संबंधित शिधापत्रिका दुकानात उपलब्ध असलेला फॉर्म भरून स्वतःच त्यांचे शिधापत्रिका रद्द करावेत.

# भंडारा शहरातील मोकाट कुत्र्यांचा तात्काळ बंदोबस्त करणे अत्यंत गरजेचे - ग्रीन हेरिटेज संस्था

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा दि.२२ सप्टेंबरः** कुत्र्यां(शवानां)ना माणसांचा सर्वात चांगला मित्र व सौरक्षक मानले जाते.पण कधी-कधी तर हे आक्रामक होवून आपल्या करिता धोका ही उत्पन्न करू शकतात.कुत्र्यांचे चावा घेण्याचे प्रमाण वाढत चालले आहे. कुत्रे लहानऱ्सहान मुलांचा चावा घेणे,त्यांना नोचून्नोचू मारून टाकने,आणि घरचे पाळीव कुत्रे ही उग्र होवून मालकावर धावून पडल्याच्या घटना ही होत आहेत.पाळीव कुत्र्यांच्या मालकांनी सुद्धा सावध राहण्याची गरज आहे.

घरच्या कुत्र्यांची आपण काळजी घेतो पण स्ट्रीट डॉग ची घेत नाहीत.त्याचे पिलू( पेटस)रस्त्यावर नाहक आपले जीव गमावतात. ग्रीन हेरिटेज संस्थेने शहरातील काही ठिकाणी निरीक्षण केले असता भंडारा शहरात सध्या मोकाट कुत्र्यांचा हैदोस, कहर वाढलेला आहे.ही कुत्रे मुस्लिम लायब्ररी चौकात ठान मांडून बसतात.चौकातून येणाऱ्या-जाणाऱ्या नागरिकांना, शाळकरी मुलांवर भुंकतात, त्यांच्या मागे धावून चावा घेण्याचा प्रयत्न करतात.



नागरिक व मुलांना आपले जीव वाचवून चालावे लागते.मुस्लिम लायब्ररी चौकापासून तर डॉ .देशकर हॉस्पिटल,कुकडे नर्सिंग होम पर्यंत याची एक मोठी ३०- ३५ कुत्र्यांची फौज असते.टिळक वार्ड ,निर्वाण गल्ली,महाल वार्ड, आजाद वार्ड, जैन डेरी ची गल्ली, शास्त्री चौक ई ठिकाणी हे कधी १० तर कधी १५ ते २० च्या संख्येने हे मोकाट कुत्रे फिरताना आढळतात. २दिवसापूर्वी टिळक वार्ड येथे चक्क २० कुत्र्यांची टोळी गल्लीतून 'मॉक ड्रिल'करताना आढळली. परिषदने या मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी त्यांची नसबंदी, निर्बीजीकरण, अँटी रेबीज बेक्सिनेशन मोहीम तत्काळ सुरू करून शहरापासून दूर नेणे किंवा जमे पर्यंत त्यांच्या पुनर्वसन करीता शेल्टर होम ची व्यवस्था न. प.ने करावी जेणेकरून या पासून नागरिकांची सुरक्षा पण होवू शकेल. या बाबत नुकतीच न. प.चे मुख्याधिकारी व प्रशासक मा.करणकुमार चव्हाण यांचे शि ग्रीन हेरिटेज चे संस्थापक मो. सईद शेख यांनी निवेदन व चर्चा केली. त्यांनी या बाबत टेंडर प्रक्रिया सुरू असल्याचे सांगितले आहे.तरीपण मोकाट कुत्र्यांचा तात्काळ बंदोबस्त करण्याची अत्यंत गरज आहे.

# माजी नगर सेवक नरेंद्र बुरडे सह पदाधिकारी शिवसेनेत



**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा दि.२२ सप्टेंबरः** भंडारा नगर परिषदेचे माजी नगर सेवक नरेंद्र बुरडे यांनी अनेक कार्यकर्त्यांसह आज आ.नरेंद्र भोंडेकर यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश घेतला. गेल्या एक आठवड्यात शिवसेनेत प्रवेश घेणारे हे दुसरे माजी आणि वरिष्ठ नगरसेवक असून यांचा प्रवेश हा शिवसेनेला लाभदायी ठरणार आहे.

शिवसेना पक्ष प्रमुख व महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या द्वारे आ.नरेंद्र भोंडेकर यांच्या माध्यमातून भंडारा विधान सभा क्षेत्रात हजारो कोटींचे विकास कार्य सकरण्यात येत आहेत. ज्याची चर्चा भंडारा विधानसभाच नाही तर संपूर्ण जिल्ह्यात ऐकायला मिळत आहे. यालाच प्रभावित होऊन अन्य पक्षातील पदाधिकारी यांनी शिवसेनेत प्रवेश घेण्याचा तगादा लावला आहे. गेल्या आठवड्यात माजी नगराध्यक्ष बाबू बागडे यांच्या प्रवेशा नंतर आज माजी नगरसेवक नरेंद्र बुरडे यांनी आपल्या पुत्र निशांत बुरडे, सौ. चंदाताई उपरिकर, सौ ज्योति ब्राम्हणकर, निखिल ब्राम्हणकर, निखिल उपरिकर, शेखर फाल्गुन वाढई यांच्या सह प्रवेश घेतला. आम. नरेंद्र भोंडेकर यांच्या जनसंपर्क कार्यालयात झालेल्या या प्रवेश दरम्यान आ . भोंडेकर यांनी सर्वांना भगवे दुपट्टे घालून त्यांचे स्वागत केले. या वेळी जिल्हा प्रमुख अनिल गायधणे, लोकसभा संपर्क प्रमुख संजय कुंभालकर, माजी नगराध्यक्ष बाबू बागडे, उपजिल्हा प्रमुख सुरेश धुर्वे, मागास वर्गीय सेनेचे जिल्हा अध्यक्ष दीपक गजभीये, श्रीकांत पंचबुद्धे, माजी नगर सेवक बंटी मिश्रा उपस्थित होते.

**जाहीर नोटीस**

**प्रोसेस क. ४२३६**

**कोर्ट विद्यमान ४ थे सह दिवाणी न्यायाधिश वरीष्ठ स्तर, भंडारा**

रे. द. नंबर ३३/२०२४

**श्री विनायक नागरी सहकारी पत संस्था मर्या, भंडारा**

**विरुध्द**

**चंद्रकुमार आसनदास सोनी व ईतर दोन**

नोटीस बनाम - जे.डी नं. १ - श्री चंद्रकुमार आसनदास सोनी,
राहणार- लाला लजपतराय वार्ड, भंडारा,
तहसिल व जिल्हा - भंडारा,

ज्याअर्थी डिक्री होल्डर श्री विनायक नागरी सहकारी पत संस्था मर्या. भंडारा, या संस्थेने आपण नोटीस बनाम व ईतर दोन यांचे विरूध्द रूपये ३,१२.७४२/- चे वसुली करीता विद्यमान कोर्टात रेग्युलर दरखास्त क्रमांक ३३/२०२४ दाखल केली आहे.

ज्याअर्थी डिक्री होल्डर संस्थेने सदर रक्कम आपण नोटीस बनाम व ईतर एक यांचे कडुन त्यांची जंगम व स्थावर मालमत्ता जप्त करून लिलावा मार्फत विक्री करून संस्थेच्या रकमेची वसुली करून द्यावी अशी विनंती केली आहे.

त्याअर्थी आपण नोटीस बनाम जे. डी. नं. २ १ ला सदर रकमेच्या वसुली बाबत काही उजर किंवा तक्रार असल्यास आपण स्वतः किंवा आपले प्रतीनिधी किंवा वकीला मार्फत दिनांक ०७/१०/२०२५ ला विद्यमान कोर्टात हजर होवुन आपले म्हणने दाखल करावे. अन्यथा आपणास काही म्हणावयाचे नाही असे समझुन सदर केस मध्ये संस्थेने मागणी केल्या प्रमाणे वसुलीची कारवाई करण्यांत येईल.सबब आज दिनांक ३०/७/२०२५ला माझे सही सिक्क्या निशी दिले आहे.

भंडारा - आदेशानुसार
दिनांक - सहा.अधिक्षक
दिवाणी न्यायालय, (वरिष्ठ स्तर,) भंडारा.

RNI No.- MAHAMAR-2010/35801 महासागर भंडारा

**मालक, मुद्रक, प्रकाशक** -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर -१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, गांधी चौक समोर, भंडारा येथे प्रकाशित केले. **संपादक**- श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन -०७१२-२७६७६२८- ९३७३११७०४२ * स्थानिक संपादक-**सुरेश लक्ष्मण कोटगले**, फोन -८७९३१९१२१३ * (पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांचेवर राहील.)

महासागर
मंगळवार २३ सप्टेंबर २०२५
भंडारा
पान ६

# राष्ट्र निमार्णात महिलांचे महत्वाचे योगदान : डॉ.मोहतुरे

**गोंदिया** : समाजाचा अर्धा हिस्सा असलेल्या महिला सशक्त आणि निरोगी असतील तर त्या सशक्त राष्ट्राच्या निमार्णात महत्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे महिलांना निरोगी आणि सशक्त बनविणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. रवींद्र मोहतुरे यांनी केले. गोंदिया शिक्षण संस्थेचे मार्गदर्शक प्रफुल पटेल, अध्यक्षा वर्षा पटेल, सचिव राजेंद्र जैन, संचालक निखिल जैन यांच्या मार्गदर्शनात आयोजित येथील नटवरलाल माणिकलाल दलाल महाविद्यालयात अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आणि अंतर्गत तक्रार समितीच्या संयुक्त विद्यमाने इम्पॅक्ट कम्युनिकेशनच्या 'पी अँड जी' ज सेलेना कॅम्पेनः 'तरुण मुलींना स्वतः बॉस करण्यासाठी सक्षम बनवणे' च्या संयुक्त सहकार्याने आयोजित विशेष कार्यक्रमात प्राचार्य डॉ. रवींद्र मोहतुरे अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. अंबादास बाकरे, हर्षिता वाघमारे आणि मोना कानडे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात शिक्षण महर्षी मनोहरभाई पटेल आणि माता सरस्वती यांच्या यांच्या प्रतिमेला माल्यार्पण आणि दीप प्रज्वलन करून झाली. कार्यक्रमाला उपस्थित ४४५ विद्यार्थिनींना पी अँड जीच्या सेलेना मोहिमेतून वैयक्तिकृत आरोग्यसेवा भेटवस्तू देण्यात आल्या. कार्यक्रमाचे संचालन हर्षू बावनकर तर आभार दिशाका गिऱ्हेपुंजे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. सरिता उदापूरकर, डॉ. अलका पाटील, डॉ. तृप्ती जसानी, डॉ. खुशबू होतचंदानी आणि डॉ. प्रियदर्शना नंदेश्वर, कृतिका कनोजिया, सायली ठाकूर, रुषाली भाजीपाले यांनी सहकार्य केले.

## दृष्टिक्षेप

### क्षुल्लक कारणावरून शिवीगाळ

**गोंदिया** : देवरी तालुक्यातील परसटोला येथे क्षुल्लक कारणावरून आरोपीने शिवीगाळ करून मारहाण करण्याची धमकी दिल्याची घटना १६ सप्टेंबर ची आहे. फिर्यादी प्रकाश रमेश रहांगडाले (४५) रा. प्रगती कॉलोनी साकोली यांच्या मालकाची दुचाकी आरोपीच्या घरासमोर उभी होती. दरम्यान आरोपी भुमेश्वर पटले (४६) रा. परसटोला याने तुज्या ग्राहकाचे वाहन माज्या घरासमोर का ठेवले, असे बोलून शिवीगाळ करीत मारहाण करण्याची धमकी दिली. तक्रारीवरून देवरी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### महिलेचा आकस्मिक मृत्यू

**गोंदिया** : रामनगर पोलिस ठाण्यातंर्गत विजयनगर येथे राहत असलेल्या एका महिलेची अचानक प्रकृती खालावल्याने तिचा मृत्यू झाला. ही घटना २० सप्टेंबरची आहे. संगीता कार्तिक नेवारे (३४) रा.भाजियापार ता.आमगाव असे मृतक महिलेचे नाव आहे. भाजियापार येथील संगीता नेवारे ही विजयनगर येथे राहत होती. घरी हजर असताना अचानक प्रकृती खालावली. तिला उपचारासाठी केटीएसमध्ये दाखल केले असता तिचा मृत्यू झाला. वैद्यकीय अहवाल व फिर्यादी डॉ.अजिंक्य चांदेकर यांच्या तक्रारीवरून रामनगर पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

### दुचाकींची अपघातात एक ठार-एक जखमी

**गोंदिया** : गोरेगाव पोलिस ठाण्यातंर्गत उदयटोली/बोरगाव येथे दोन दुचाकींची अमोरासमोर धडक झाली. या घटनेत दुचाकीस्वार युवकाचा मृत्यू झाला तर एक युवक गंभीर जखमी झाला. ही घटना २० सप्टेंबरची आहे. लक्की महेश मेश्राम (१८) रा.बोरगाव असे मृतकाचे तर सागर सुनिल गणवीर (२१) असे जखमीचे नाव आहे.

सविस्तर असे की, लक्की मेश्राम व सागर गणवीर हे दोघे दुचाकी क्र.एमएच-३५/एम-६७१२ ने जात होते. दरम्यान समोरून येणाऱ्या दुचाकी क्र.एमएच-३५/एक्यु-४१३५ च्या चालकाने लापरवाहीने चालवून लक्की मेश्राम याच्या दुचाकी जबर धडक दिली. या अपघात लक्की व सागर हे जखमी झाले. लक्की मेश्राम याला जबर मार लागल्याने त्याचा मृत्यू झाला. या घटनेची नोंद गोरेगाव पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. पुढील तपास पोउपनि घोलप करीत आहेत.

### विद्यार्थ्यांसाठी तण व्यवस्थापनावर प्रात्यक्षिक

**आमगाव** : तालुक्यातील पदमपुर येथे विद्यार्थ्यांसाठी तण व्यवस्थापनावर प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले. या प्रात्यक्षिकामध्ये हाताने तण काढणे व तणनाशक फवारणी या दोन पद्धती दाखवण्यात आल्या.या प्रात्यक्षिकास भगत, ऊराडे, उपज तसेच कार्यक्रम अधिकारी ब्राह्मणकर आणि विषय शिक्षक दमाहे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. या प्रात्यक्षिकामध्ये विद्यार्थिनी सेजल यादव, तेजस्विनी रामटेके, अमीषा वरकड़े, करीना तुमसरे, प्राची शहारे यांनी सहभाग घेतला. शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना माहिती देण्यात आली की, योग्य वेळी तण नियंत्रण केल्यास पिकाला वाढीस पोषक वातावरण मिळते. तसेच योग्य प्रकारे तण नियंत्रण व तणनाशकाची फवारणी केल्यास उत्पादनावर चांगला परिणाम होतो. यासाठी फवारणी करताना सुरक्षिततेची काळजी घेणे गरजेचे असल्याचेही सांगण्यात आले. या प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना तण नियंत्रणाच्या पद्धतींचे प्रत्यक्ष ज्ञान मिळाले असून, उत्पादन वाढीस याचा निश्चितच लाभ होणार आहे.

# सागवन झाडाची कत्तल व तस्करी करणाऱ्यांवर वन विभागाची कारवाई

## वनपरिक्षेत्रातील शेंडा सहवनक्षेत्रातील पुतळी येथील घटना



**प्रतिनिधी / सडक अर्जुनी**

वन विभागाला मिळालेल्या गोपानीय माहितीच्या आधारावरून वनपरिक्षेत्र शेंडा सहवनक्षेत्र मौजा पुतळी येथे सागवन झाडांची कत्तल व तस्करी करण्याच्या अनुषंगाने दबा ठेवून बसलेल्या आरोपींना वन विभागाने अटक करून केली आहे. ही घटना १९ सप्टेंबरच्या रात्री दरम्यानची आहे. पुरुषोत्तम भेंडारकर (२७), दयावान वरखडे (२०), विजय परतेकी (२७) तिन्ही रा. मोहघाटा तसेच प्रदीप मरसकोल्हे (२७) रा. शिरपूर ता. देवरी अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

सडक अर्जुनी तालुक्यातील वनपरिक्षेत्रातील शेंडा सहवनक्षेत्रातील मौजा पुतळी येथे अवैध सागवन झाडांची कत्तल झाल्याची घटना उघडकीस आली. दरम्यान गोपनीय माहितीच्या आधारावरून वन विभागाने दोनपथके तयार करून नजर ठेवली. त्यातच पुतळी गावाकडून शेंडाकडे दुचाकीने येणाऱ्या इसमावर पथकाची नजर पडली.

दरम्यान पुतळी नाल्याजवळ दयावान वरखडे याला थांबवून त्याची कसून विचारपूस केली असता, त्यांनी सांगितले की, पुरुषोत्तम भेंडारकर, विजय परतेकी व एक अन्य व्यक्ती जंगलात सांगवानची झाडे कापण्यासाठी गेले आहेत व मी गावाबाहेर उभे राहून पाळत ठेवण्याचे काम करीत आहेत. दरम्यान वन विभागाने पाहणी केली असता, तिन्ही आरोपी हे झाडाजवळ दबा धरून बसले होते. धाड टाकून तिन्हीआरोपींनी अटक करण्यात आली तसेच घटनास्थळापासून ५० मीटर अंतरावर सागवन प्रजातीची दोन फुटची खोड व एक झाड अर्धवट कापलेले दिसू न आले. पुरुषोत्तम भेंडारकर (२७), दयावान वरखडे (२०), विजय परतेकी (२७) तिन्ही रा. मोहघाटा तसेच प्रदीप मरसकोल्हे (२७) रा. शिरपूर ता. देवरी यांना ताब्यात घेवून वनगुन्हा नोंदवून भारतीय वन अधिनियम, १९२७ नुसार कारवाई करण्यात आली.

### यांनी केली कारवाई

**वनपरिक्षेत्र शेंडा सहवनक्षेत्र मौजा पुतळी येथे सागवन झाडांची कत्तल व तस्करी होत असल्याचा प्रकार समोर येताच वन विभागाने कारवाई करीत चौघांना अटक केली आहे. ही कारवाई वनपरिक्षेत्र अधिकारी मिथून तरोणे, क्षेत्रसहाय्यक कु. व्ही. बी. रहिले, यु. पी. गोटाफोडे, कु. व्ही.आर. ब्राम्हणकर, कु. एस. डी. मेंढे, एस. एस. हटवार, व्ही. एन. काईट, समिर बंसोड, विपुल शहारे, किसोर बडवाईक यांनी केली.**

# पोत्यात कुंजलेल्या अवस्थेत मृतदेह आढळला

**प्रतिनिधी / सालेकसा**

तालुक्यातील दशरथटोला/बामणी परिसरात पोत्यात कुंजलेल्या अवस्थेत मृतदेह आढळला. ही घटना (ता.२०) सकाळी ९ वाजता सुमारासची आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली. सालेकसा पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला. तसेच सदर मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी नागपूर येथे पाठविण्यात आल्याची माहिती आहे. सदर मृतदेहाला घेवून उलटसुलट चर्चांना पेव फुटले असून हत्या करून मृतदेहाची विल्हेवाट लावण्यात आली असावी? अशी चर्चा जोमात सुरू आहे. तर दुसरीकडे पोलिसांच्या तपास कार्याकडे लक्ष लागले आहे.

दशरथटोला/बाम्हणी परिसरात काही शेतकरी शेताकडे गेले होते. दरम्यान कुंजलेला वास परिसरात दरवळत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. दरम्यान आजुबाजू पाहणी केला असता काही समजून आले नाही. तर काही अंतरावरून तीव्र दुर्गंध येत असल्याचे जाणवले. याची माहिती सालेकसा पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी त्वरित घटनास्थळ गाठून परिसराची तपासणी केली असता धानाच्या पोत्यात एक मृतदेह आढळून आला. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी नागपूर येथे पाठविण्यात आल्याचे बोलले जात आहे. या घटनेला घेवून विविध प्रश्न निर्माण झाले असून मृत कोण? अशी चर्चा सुरू झाली आहे.

# नेत्र तपासणी शिबीराचा १७५ जणांनी घेतला लाभ

**प्रतिनिधी / गोंदिया**

आयुष आरोग्यवर्धिनी केंद्र डोंगरगाव व समता फाऊंडेशन महात्मे नेत्र रुग्णालय नागपुर यांचे सहकार्याने डोंगरगाव येथे निशुल्क मोतिबिंदु तपासणी शिबीर १५ सप्टेंबर रोजी करण्यात आले. नेत्र तपासणी शिबीराचे उदघाटन जिल्हा परिषदेचे माजी महिला व बाल विकास सभापती सविताताई पुराम यांचे हस्ते करण्यात आले. या शिबीरामध्ये मोफत डोळे तपासणी व मोतिबिंदु निदान चाचणी करण्यात आली. तपासणी शिबीराप्रसंगी १७५ व्यक्तींची नोंदणी करुन १३५ व्यक्तींची मोतिबिंदु तपासणी करण्यात आली. डोंगरगाव येथे नेत्र तपासणी शिबीराला ग्रामस्थांनी उत्फुर्त्स प्रतिसाद दिला.

यात विविध प्रकारच्या नेत्र समस्यांनी ग्रासलेल्या १३५ रुग्णांपैकी ८१ मोतिबिंदु रुग्णांना महात्मे नेत्र रुग्णालय नागपुर येथे मोफत शस्त्रक्रिया आणि उपचारासाठी संदर्भित करण्यात आले. शिबीराप्रसंगी १२३ व्यक्तींची मधुमेह व रक्तदाब तपासणी करण्यात आली. तसेच ईतर महत्वाचे ३६ रुग्णांचे आवश्यक प्रयोगशाळा तपासणी सुद्धा करण्यात आल्याची माहीती आयुष वैद्यकीय अधिकारी डॉ.सुजाता ताराम यांनी दिली आहे. आयुष आयुवेर्देचा प्रचार होण्याच्या दृष्टीकोनातुतुन ५४ आयुर्वेद पुस्तिकाचे वितरण करण्यात आले.

तसेच ४ व्यक्तिंच्या हस्ते आयुष दवाखाना परिसरात वृक्ष लागवड सुद्धा यावेळी करण्यात आले. मोतिबिंदु तपासणी शिबीरात महात्मे नेत्र रुग्णालय नागपुरचे नेत्ररोग तज्ञ डॉ.दिशा यांनी नेत्र तपासणी केली तर समाजसेवक प्रफुल उकुंडे यांनी समुपदेशन केले. आयुष आरोग्यवर्धिनी केंद्र डोंगरगावच्या वतीने आयुष वैद्यकीय अधिकारी डॉ. सुजाता ताराम,समुदाय आरोग्य अधिकारी डॉ.प्रियंका गणवीर, आरोग्य सेविका माधुरी वैद्य,आरोग्य सेवक नागरे व मोरे यांचे सह आशा सेविका व परिचर यांनी रुग्ण सेवा बजावली.

# कारभारणीचंही नाव लागणार सातबारावर

## लक्ष्मी मुक्ती योजना; जिल्ह्यात राबविली जाणार

### बचत गटातून कर्ज पुरवठा...

**लक्ष्मी मुक्ती योजना अंतर्गत महिलांना शेतमालकीचा हक्क मिळाल्यानंतर बचत गटांच्या माध्यमातून त्यांना कर्ज पुरवठा करता येणार आहे. या योजनेमुळे महिलांना शेती संबंधित आर्थिक मदत सहज मिळता येईल. ज्यामुळे त्यांच्या शेती व्यवसाय अधिक सक्षम आणि स्वावलंबी होण्यास या योजनेमुळे मदत होणार आहे.**

**प्रतिनिधी / गोंदिया**

महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी सातबारावर पत्नीचे नाव नोंदणी शून्य खर्चात करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. ग्रामीण भागातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी आणि शेतमालकीत थेट सहभाग मिळावा यासाठी महाराष्ट्र शासनाने लक्ष्मी मुक्ती ही योजना सुरू केली आहे.

या योजनेचे उद्दिष्ट म्हणजे महिलांना शेती मालमत्तेवर थेट हक्क प्रदान करणे. योजनेच्या अंतर्गत पती आपल्या नावावरील सातबारा उतारावर पत्नीचे नाव सहधारक म्हणून अधिकृतपणे नोंद करू शकतो. या उपक्रमामुळे महिलांना केवळ मालकीचा अधिकारच मिळणार नाही तर त्यांना आर्थिक निर्णय प्रक्रियेतही सहभागी होता येणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जासोबत काही आवश्यक कागदपत्रे जोडावे लागतात. यात विवाह प्रमाणपत्र, लग्न नोंद सातबारा उताराची सध्याची प्रत आणि आधार कार्ड किंवा अन्य ओळखपत्र याचा समावेश होतो. लक्ष्मी मुक्ती योजनेअंतर्गत पत्नीचे नाव सातबारा उतारावर सहहिस्सेदार म्हणून नोंदवण्यासाठी कोणतेही नोंदणी शुल्क, शासकीय शुल्क किंवा मुद्रांक शुल्क आकारले जात नाही. ही प्रक्रिया पूर्णपणे विनामूल्य असून लाभार्थ्यांनी कोणत्याही अनाधिकृत व्यक्तीच्या भूलथापाना बळी पडू नये असे स्पष्ट निर्देश महसूल प्रशासनाने दिले आहेत.



अर्ज करण्यासाठी अर्जदारांना आपल्या गावातील तलाठी कार्यालयात थेट संपर्क साधावा लागेल तलाठ्यांकडे पत्नीचे नाव सहहिस्सेदार म्हणून सातबारा उतारावर नोंदणीसाठी अर्ज सादर करावा लागणार आहे. ही प्रक्रिया स्थानिक स्तरावर सहज आणि पारदर्शकपणे पूर्ण केली जाते.

# महाबोधी महाबुध्द विहार मुक्त हाच माझा जीवन संघर्ष : भदंत विनाचार्य

## भदंत विनार्चाय यांचा जनसंवाद व धम्मदेशना




**प्रतिनिधी / अर्जुनी/मोर**

२० सप्टेंबरला घेण्यात आलेल्या पंचशिल धम्म ध्वज यात्रा,व भदंत विनाचार्य यांचा जनसंवाद ऐकण्यासाठी तालुक्यातील अफाट जनसमुदाय जमला. यात धम्म ध्वज यात्रा न भूतो न भविष्यती असा अनोखा विक्रमी चित्र पहायला मिळाला. दरम्यान महाकारुनिक तथागत भगवान गौतम बुद्ध व बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतीमांना पुष्प फुले वाहून दिप प्रज्वलन करून करण्यात आले.

दरम्यान भदंत विनाचार्य जनसंवाद व धम्मदेशना सुरवात झाली, त्यांनी सांगितले की, जग आज विनासाच्या मार्गाकडे वळत असतांनी,या विनासाला तथागतांचा धम्माच,शांतमय मानवी जीवनाचा प्रवास करवु शकतो. ज्या तथागतांनी अखील मानवजातीला व सृष्टीतील प्राण्यांना,सुखाचा समाधानाचा व समतेचा निवारा दिला . त्या तथागताला जिथे संबोधी प्राप्त झाली. त्या महाबोधी महाविहाराला मुक्त करण्यासाठी आज संपूर्ण देशांमध्येच नव्हे, तर जगामध्ये, सुद्धा आंदोलनांचा मार्ग अवलंबवा लागणार आहे.प्रत्येक धर्मियांचे आस्तास्थान त्या त्याच धर्मियांकडे असतांनाच महाबोधी महाविहार हिंदु धर्मियांकडेच का? इतीहासांच वाचन करीत असतांनी बुद्धांच्या धर्माला नामशेष करण्यासाठी ज्या हिंदुं धर्मियांनी जीवाचं राण केलं , भिक्खु संघाच्या कत्तली केल्या गेल्या, व १८९१ साली, धम्मपाल अनागारीक यांनी बौदध गयेला आंतरराष्ट्रीय सम्मेलन बोलावुन, त्यामध्ये -जापान, श्रीलंका, कोरीया, व्हियेतनाम असे अनेक बौद्ध धर्मिये, राष्ट्रांचे प्रतीनीधी येवुन, बौद्ध गयेच्या भुमिची अवस्था पाहून दुःखी होउन अश्रु ढाळले.

अशा पद्धतीने बुद्धांच्या धम्माचा ऱ्हास करणारे लोक आज कसेकाय बुद्धांच्या महाबोधी महाविहारावर हक्क कसे काय गाजवताहेत? व भारतीय बौद्धांना व जगातील बौद्धांना हे का निराष करतात? प्रत्येक बौद्धांनी महाबोधी महाविहार मुक्त करण्याचा, आपल्या जीवनाचे मुख्य ध्येय समजून,या आदोलनात सहभागही व्हावे, असे आवाहन भदंत विनाचार्य यांनी आवाहन केले. या कार्ये क्रमाच्या यशस्वीतेसाठी भारतीय बौद्ध महासभेचे अध्यक्ष आर.के. जाभुळकर, संयोजक आयु. सोनदास गणवीर, यशवंत गणवीर प्रतापगड, जगझापे, जगदिश मेश्राम, रमेश लाडे, शालिकराम जनबंधु, नागेंद्र खोब्रागडे, सरपंच श्रीकांत लोणारे, संजय लोणारे, मोरेश्वर गोंडाने, जनार्दन मेश्राम, अशोक मेश्राम, हरीदास बांबोळे, हिरालाल कोटांगले, सुभाष लाडे, मंगलाताई बांबोडे, वैशालीताई खोब्रागडे, जयश्रीताई खोब्रागडे, मालन ताई मेश्राम, कल्पना ताई सांगोळे, वंदनाताई साखरे, जनबंधुताई, माला ताई सुदामे, समता सैनिक दलाचे, अजय अंबादे, मोरेश्वर धारगावे पत्रकार, अखील भारतीय आदिवासी विकास परिषद अर्जुनी मोरगाव ह्या संघटनेचे जिल्हाध्यक्ष मंगेश भलावी व त्यांची टिम, लक्ष्मीकांत मळावी, तसेच बौद्ध उपासक उपासिका सहकार्य केले.

### शिवीगाळ करून मारहाण

**प्रतिनिधी / गोंदिया**

गंगाझरी पोलिस ठाण्यातंर्गत बोरा येथे जुन्या भांडणातून आरोपी अशोक जगन्नाथ केवट याने शिवीगाळ करून मारहाण केली. ही घटना २९ सप्टेंबरच्या दुपारी १२:४७ वाजता सुमारासची आहे. या प्रकरणी फिर्यादी महिलेच्या तक्रारीवरून गंगाझरी पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पोहवा राजेश जौजाळ करीत आहेत.

# सिल्ली-नवेझरी खड्डेमय मार्ग धोकादायक



## वर्षभरापूर्वीच काम तरीही रस्ता बेहाल

**विशेष म्हणजे, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने तिरोडा-सिल्ली ते नवेझरी या राज्य महामार्गाची दुरूस्ती व डागडुजीचे काम वर्षभरापूर्वीच करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. सदर काम करताना लाखो रुपए खर्च करण्यात आले. पण अल्पावधीच रस्त्याचे तिनतेरा झाल्याने कामाच्या नावावर अधिकारी व कंत्राटदाराने आपले खिसे गरम केले? असा आरोप नवेझरी वासीयांकडून केला जात आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देवून रस्ता दुरूस्त करावा, तसेच निकृष्ट काम करणाऱ्या कंत्राटदार व अधिकाऱ्यांना निलंबित करावे, अशी मागणी केली जात आहे. अन्यथा रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करणार, असा इशारा प्रहारचे जिल्हाध्यक्ष महेंद्र भांडारकर यांनी दिला आहे.**

**प्रतिनिधी / तिरोडा**

तालुक्यातील तिरोडा-सिल्ली ते नवेझरी महामार्गाची दुरवस्था झाली आहे. रस्ता खड्डेमय झाला असून धोकादायक स्थितीला आला आहे. राज्य महामार्ग असल्याने या मार्गावरुन मोठी वाहतूक असते. अशात रस्त्यावरील खड्डे जिवघेणे ठरत आहेत. खड्डेमय रस्त्यामुळे अपघाताची मालिका सुरू झाली असून सांबा विभाग व जनप्रतिनिधी या गंभीर बाबीकडे दुर्लक्ष करीत आहेत. यामुळे एखादे मोठे अपघात घडल्यानंतरच विभागाची झोप उघडणार का? असा प्रश्न निर्माण केला जात आहे.

तिरोडा तालुक्यातील शेवटच्या टोकावर नवेझरी गाव आहे. मंडळ गाव असल्याने या ठिकाणी बँक, शाळा, महाविद्यालयासह कामकाजासाठी परिसरातील गावातील नागरिक, विद्यार्थी, शेतकऱ्यांची मोठी वर्दळ असते. तिरोडा-सिल्ली ते नवेझरी याच मार्गाने या क्षेत्रातील वाहतूक सुरू असते. शिवाय राज्य महामार्ग असल्याने करटी, मुंढरी, भंडारा, तिरोडा एसटीची बसफेरीही धावत असते. परंतु, रस्ता अत्यंत दुरवस्थेला आला आहे. मार्गावर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. त्यामुळे रहदारी करताना समस्यांना समोर जावे लागत आहे. रस्त्यावरील खड्ड्यामुळे संपूर्ण रस्ताच खड्ड्यात गेला की काय? असा अनुभव प्रवाशांना येत आहे. तर दुसरीकडे खड्ड्यांमुळे अपघात घडून येत आहेत. या प्रकाराकडे नवेझरीसह परिसरातील नागरिकांनी विभाग व जनप्रतिनिधींचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. परंतु, याकडे सातत्याने दुर्लक्ष केले जात आहे. यामुळे सदर रस्ता धोकादायक स्थितीला आला असून प्रवास करणे दिवसेंदिवस अवघड जात आहे. अशा परिस्थितीत एखादे मोठे अपघात झाल्यावरच साबां विभागाला जाग येणार का? असा सवाल संतप्त नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

# ४८ तासांत ३० किलो चांदीसह आरोपी जेरबंद

## गोंदिया शहर पोलिसांची धडाकेबाज कामगिरी



**प्रतिनिधी / गोंदिया**

गोंदिया शहर पोलिसांनी अवघ्या ४८ तासांत तब्बल ३० किलो चांदीचा मुद्देमाल आणि आरोपी जप्त करून मोठी कामगिरी बजावली आहे. जप्त केलेल्या चांदीची किंमत ३८ लाख रुपये असून, यामध्ये गुन्ह्यात वापरलेली दुचाकीही पोलिसांनी हस्तगत केली आहे.

फिर्यादी रोहित रमेश सोनी (वय ३६, रा. रामनगर, गोंदिया) यांची "रोहित ज्वेलर्स" नावाची सोन्या-चांदीची दुकान आहे. त्यांनी दि. ९ सप्टेंबर रोजी राजकोट येथील थोक व्यापाऱ्याकडून मोबाईल ॲप्लिकेशनद्वारे ५० किलो चांदी खरेदी केली होती. ही चांदी दोन पार्सलमध्ये (३० किलो व २० किलो) विभागून कुरीयरने गोंदिया येथे पाठविण्यात आली होती. मात्र, त्यातील ३० किलो चांदीचे पार्सल मार्गातच अफरातफर झाले. या घटनेवरून दि. १८ सप्टेंबर रोजी गोंदिया शहर पोलीस ठाण्यात अप.क्र. ७८२/२०२५ कलम ३१६(३) भा.न्या.सं. २०२३ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलिस निरीक्षक किशोर पर्वते यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने वी.आय.पी. पार्सल सर्व्हिस (बोरी नागपूर), बजाज नगर (भंडारा), तुमसर, तिरोडा तसेच शेखावत ट्रान्सपोर्ट गोंदिया येथे चौकशी केली. याच दरम्यान गोपनीय बातमीदाराने दिलेल्या माहितीच्या आधारे संशयित जिया अली कमर अली सय्यद (वय ३५, रा. बाजार चौक, रामनगर, गोंदिया) यास ताब्यात घेण्यात आले.

चौकशीत त्याने ३० किलो चांदीचे पार्सल अफरातफर केल्याचे कबूल केले. पोलिसांनी त्याच्याकडून मुद्देमाल झ्र ३० किलो चांदी (किंमत ३८ लाख रुपये) व गुन्ह्यात वापरलेली सुजुकी मॉपिड (किंमत ३० हजार रुपये) असा एकूण ३८ लाख 30 हजार रुपयांचा ऐवज जप्त केला.

या कामगिरीत अपर पोलिस अधीक्षक अभय डोंगरे, उपविभागीय पोलिस अधिकारी रोहिणी बानकर यांच्या देखरेखीखाली पोउपनि. अनिल डोंगरवार, घनश्याम थैर, हवाला. कवलपालसिंग भाटीया, सतिश शेंडे, सुदेश टेंभरे, निशिकांत लॉंदासे, प्रमोद चव्हाण, दिपक राहांगडाले, शि. सुभाष सोनवाने, दिनेश बिसेन, अशोक रहांगडाले, कुणाल बारेवार, मुकेश रावते, प्रमोद शेंडे, सोनु नागपुरे, राकेश बंजारे, अजय बोपचे, सनोज सपाटे यांनी मोलाचे योगदान दिले.

### पत्रकार परिषदेत माहिती

**या प्रकरणी आज २२ सप्टेंबर रोजी पोलिस अधिक्षक कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत पोलिस अधीक्षक गोरख भामरे यांनी ही माहिती दिली. त्यांनी सांगितले की, गोंदिया पोलिसांनी दक्षता आणि कसून तपासामुळे मोठ्या प्रमाणातील चोरी उघडकीस आणली असून, आरोपीसह माल जप्त करण्यास अवघ्या ४८ तासांचा कालावधी लागला.**

# गळफास घेवून युवकाची आत्महत्या

**गोंदिया** : तिरोडा पोलिस ठाण्यातंर्गत पारसनगरी तिरोडा येथे एका ३० वर्षीय युवकाने घरातील खोलीत गळफास घेवून आत्महत्या केली. ही घटना २० सप्टेंबरची आहे. आशुतोष माणिक रहांगडाले (३०) रा.पारसनगरी तिरोडा असे मृताचे नाव आहे. फिर्यादीची बहिण खोलीची साफसफाई करण्याकरीता गेली असता आशुतोष याच्या खोलीचा दार बंद दिसून आला. हाक दिली असता कसलाही प्रतिसाद मिळाला नाही. यामुळे मागील भागातून खिडकीतून पाहिले असता दुपट्टयाने तयार केलेल्या फांसावर आशुतोष याचा मृतदेह टांगलेला दिसून आला. फिर्यादी महेंद्र ग्यानीराम सोनवाने याच्या तक्रारीवरून तिरोडा पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे.

# जोश

## अंड्याची गरमागरम भजी



झटपट रेसिपी

दोन स्तांनो, पावसाळ्यात गरमागरम भजी खायची लहर येते. अशावेळी हॉस्टेलमध्येच तुम्ही भजीचा घाट घालू शकता. बटाटा, कांदा, पालक या भजी आपण नेहमीच खातो. त्यामुळे यंदा अंड्याची भजी ट्राय करायला हरकत नाही.

**साहित्य :** चार उकडलेली अंडी, चार मोठे चमचे बेसन, चिमूटभर मिरपूड, अर्धा चमचा लाल तिखट, अर्धा चमचा ओवा, अर्धा चमचा चाट मसाला, मीठ आणि तेल.

**कृती :** उकडलेल्या अंड्यांचे दोन भाग करा. अंड्यांना मीठ आणि मिरपूड लावून ठेवा. आता एका भांड्यात बेसन घ्या. त्यात लाल तिखट, चवीनुसार मीठ, ओवा आणि गरजेनुसार पाणी घालून भजीचं पीठ तयार करा. हे पीठ फार घट्ट आणि सैलही नको. त्यामुळे बेताने पाणी घाला. कढईत तेल गरम करून घ्या. अंड्याचे तुकडे बेसनच्या पिठात घोळवा. हलकेच कढईत सोडा. सोनेरी रंगावर तळून घ्या. ही भजी चटणी किंवा सॉससोबत खा.

## खेळाच्या आवडीतून उभा केला व्यवसाय



अचिव्हर

कधी कधी आपण आपल्या बालपणी किंवा तारुण्यात येणाऱ्या समस्या अनेक वर्षांनी सोडवू शकतो. अशीच एक गोष्ट एका बास्केटबॉल खेळाडूसोबत घडली. बास्केटबॉल खेळाडू असलेल्या महेंद्र केवलानीने बराच काळ बास्केटबॉल कोर्टभोवती जीवन जगले. राज्यस्तरीय बास्केटबॉल खेळाडू असल्याने त्याने शिस्त आणि कठोर परिश्रम ही आपली सवय बनवली. त्याने व्यावसायिक खेळाडू होण्याचे स्वप्न पाहिले नव्हते; परंतु खेळाने एक मोठा उद्देश दिला आणि या उद्देशाने नंतर तो एक यशस्वी उद्योजक बनला.

बास्केटबॉल खेळताना महेंद्रला जाणवले, की लहान शहरांमधील खेळाडूंना दर्जेदार स्पोर्ट्सवेअर मिळणे कठीण आहे. योग्य आकार, टिकाऊ साहित्य आणि परवडणारी किंमत या तिन्ही गोष्टी एकत्र मिळवणे जवळजवळ अशक्य होते. त्याच्या सहकारी खेळाडूंचे कपडे फक्त काही धुण्यात खराब होत. या कमतरतेमुळे त्याला कुलीश स्पोर्ट्स नावाची कंपनी सुरू करण्याचे स्वप्न पडले. हा ब्रँड स्टायलिश, टिकाऊ आणि परवडणारे स्पोर्ट्सवेअर निर्मिती करतो.

व्यावसायिक पार्श्वभूमीत वाढलेल्या महेंद्रने पाच वर्षे कॉर्पोरेट ऑडिटिंगमध्ये काम केले, परंतु २०१६ मध्ये त्याने १५ लाख रुपयांच्या भांडवलासह कुलीश स्पोर्ट्सची पायाभरणी केली. त्याने एक लहान पण उत्तम डिझाइन टीम तयार केली; जेणेकरून खर्च कमी होईल आणि गुणवत्ता राखली जाईल. देशात नोटाबंदी आणि जीएसटीसारखे मोठे बदल होत असताना त्याने ही कंपनी सुरू झाली; परंतु एक स्मार्ट रणनीती स्वीकारली आणि २०२३ मध्ये वॉलमार्ट वृद्धी कार्यक्रमात सामील झाला. त्याने व्यवसाय पुढे नेला. याचा परिणाम असा झाला, की २०२४ मध्ये त्याचे वार्षिक उत्पन्न २.३ कोटी रुपये तर २०२५ मध्ये तीन कोटी रुपये झाले.

महेंद्रच्या या ब्रँडच्या ऑनलाइन विक्रीपैकी ९० टक्के विक्री फ्लिपकार्ट आणि 'मिंत्रा' कडून येते. मिंत्राकडून दररोज ५०-८० ऑर्डर मिळतात तर एकूण ४००-५०० ऑर्डर दररोज वितरित केल्या जातात. त्यांनी दक्षिण आणि ईशान्य भारतात ऑफलाइन वितरक मॉडेल स्वीकारले आहे. कंपनीच्या दिल्ली टीममध्ये ३२ सदस्य आहेत आणि पश्चिम बंगाल, कर्नाटक आणि हरियाणामध्ये नवीन गोदामे बांधली जात आहेत.

## शेर की जुबानी

हम तो आईना है,
आईना ही रहेंगे।
फिक्र वो करें...
जिनके चेहरे पर कुछ और
दिल में कुछ और है।

हम तो अल्फाज
ही ढूंढते रह गए,
और वो आंखों
से गज़ल कह
गए।

जिंदगी एक हसीन ख्वाब है,
जिसमें जीने की चाहत होनी चाहिये। गम खुद ही खुशी में बदल जाएँगे, मुस्कुराने की आदत होनी चाहिये।

## एआयच्या अंतरंगात


### 'एआय'मुळे उलगडणार नेत्रविकार



'एआय' (आर्टिफिशियल इंटेलिजेंस) च्या आगमनानंतर जग बदलाच्या प्रक्रियेतून जात आहे. प्रत्येक क्षेत्रात 'एआय'चे चमत्कार दिसून येत आहेत. वैद्यकीय क्षेत्रात 'एआय'ने अनेक गोष्टी सोप्या केल्या आहेत. यामुळे, रोग ओळखणे सोपे झाले आहे. त्याचा रुग्णांना फायदा होत आहे. 'एआय' कोणतीही लक्षणे दिसण्यापूर्वीच डोळ्यांचे आजार शोधेल. यामुळे रुग्णाची स्थिती आणखी बिघडण्यापासून रोखता येईल.

'एआय' अल्गोरिदम आणि इतर सखोल तंत्रज्ञानाचे उपाय डोळ्यांवरील उपचारांची दिशा पूर्णपणे बदलू शकतात. लक्षणे सुरू होण्यापूर्वीच ते कोणताही आजार ओळखतील. सध्या डोळ्यांचे आजार ओळखण्याचे संपूर्ण काम मानवी विश्लेषणावर अवलंबून आहे आणि त्यासाठी बराच वेळ लागतो. ही समस्या दूर करून, 'एआय' मोठ्या डेटावर सहज आणि अचूक प्रक्रिया करू शकते. यामुळे, हा आजार त्याच्या सुरुवातीच्या टप्प्यावरच ओळखला जाईल. 'डायबेटिक रेटिनोपॅथी' आणि 'ग्लुकोमा' सारख्या आजारांमध्ये सुरुवातीलाच रेटिनामध्ये किरकोळ बदल होतात. रुग्णाला कळण्यापूर्वीच एआय हे बदल ओळखू शकते. यामुळे त्यांना वेळेवर उपचार मिळू शकतील आणि अनेक प्रकरणांमध्ये ते लोकांना अंध होण्यापासून वाचवेल. डेटा विश्लेषणाच्या मदतीने, हे तंत्रज्ञान आजारामुळे डोळ्यांमध्ये होणारे अगदी लहान बदलदेखील ओळखू शकेल. आजारी पडल्यानंतर उपचार करण्याऐवजी, आजारी पडण्यापूर्वी त्याच्या उपचारांकडे वाटचाल करण्याची गरज आहे. रोग होण्यापूर्वी त्याची ओळख आणि प्रतिबंध यासाठीदेखील एआय तंत्रज्ञानाचा वापर करता येत आहे.

## करिअर निवडण्यासाठी श्रीकृष्णाच्या टिप्स!




मार्गदर्शन

आजकाल नोकरी मिळवणं हे अनेक तरुणांसाठी मोठं आव्हान ठरलं आहे. मार्क्स चांगले आहेत, पदवीही मिळाली, पण 'पुढे काय करावं?' असा प्रश्न मनात सतत येतो. अशा संभ्रमात आपण हजारो वर्षांपूर्वी कुरुक्षेत्रावर उभ्या अर्जुनासारखेच असतो. अर्जुनही गोंधळलेला होता; पण त्याच्या सोबत होते श्रीकृष्ण, ज्यांनी त्याला फक्त युद्धासाठी नव्हे, तर संपूर्ण जीवनासाठी योग्य निर्णय घेण्याची शिकवण दिली. अशा टिप्स आताही उपयोगी पडतात.

**❊ स्वतःची ओळख पटवून घ्या**

कृष्णाने सर्वप्रथम अर्जुनाला आठवण करून दिली, 'तू योद्धा आहेस, हे तुझं स्वधर्म आहे.' तसंच आपणही आधी स्वतःला विचारलं पाहिजे, की माझी नेमकी स्वभाववैशिष्ट्ये काय आहेत? मला नक्की काय करायला आवडतं? फक्त नोकरीचं फॅन्सी नाव, पगार, किंवा दुसऱ्यांचं अनुकरण करून निर्णय घेणं टाळावं. आतून जुळणाऱ्या गोष्टींची निवड करावी, कारण तिथेच समाधान आणि यश असतं.

**❊ संभ्रम स्वीकारा**

युद्धात गोंधळ झाला, तेव्हा अर्जुन झोपला नाही. उलट, त्याने प्रश्न विचारायला सुरुवात केली. आजच्या काळात, संभ्रमात पडणं ही नैसर्गिक गोष्ट आहे; पण तो संभ्रम तुमच्या निर्णयाला अडथळा बनू नये. थोडा वेळ स्वतःला द्या, विचार करा आणि मग पुढे जा.

**❊ कृती करा, पण फळाची अपेक्षा न ठेवता...**

'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' ही गीतेतील सर्वात प्रसिद्ध ओळ. कृष्ण म्हणतो, 'तू फक्त आपल्या कर्तव्यावर लक्ष केंद्रित कर.' म्हणजेच करिअरच्या वाटेवर चालताना केवळ यश मिळेल का याचं गणित करू नका. पूर्ण मन लावून, स्वतःला झोकून देऊन काम करा, यश आपोआप मिळेल.

**❊ मन आणि विचार**

मन शांत आणि स्थिर असणं गरजेचं आहे. करिअरमधील आव्हानांना सामोरं जाण्यासाठी मनावर नियंत्रण असावं लागतं. हे नियंत्रण दीर्घकाळ टिकणाऱ्या यशापर्यंत घेऊन जातं.

**❊ जीवनात संतुलन ठेवा**

काम आणि विश्रांतीमध्ये संतुलन ठेवणं खूप गरजेचं आहे. श्रीकृष्ण म्हणतात, काम करताना संतुलित असायला हवं. आणि हे संतुलन करिअर खऱ्या अर्थाने यशस्वी करेल.

**❊ काही गोष्टी सोडायला शिका**

श्रीकृष्ण सांगतात, 'सोडणं म्हणजे हरणं नाही, तर मुक्ती आहे.' कधी-कधी काही क्षेत्र सोडावी लागतात, काही गोष्टी नाकाराव्या लागतात, कारण त्या आपल्या स्वभावाशी जुळत नाहीत. अपराधी भाव न बाळगता, पुढच्या योग्य संधीसाठी जागा मोकळी करा.

**❊ मार्गदर्शन घ्या आणि शिकत राहा**

जेव्हा अर्जुन 'कृपया मला मार्गदर्शन करा,' असे म्हणतो तेव्हाच त्याचा खरा प्रवास सुरू होतो. आज अनेक तरुण आपल्याला सगळं माहिती असल्याच्या भ्रमात असतात; पण खरे यशस्वी लोक तेच असतात जे योग्य वेळी मार्गदर्शन स्वीकारतात, मन उघडतात, आणि स्वतःला सुधारणं शिकतात.

## 'एआय' शिकून करा कॉर्पोरेट जगतात प्रवेश




करीअरवेध

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' (एआय)चे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. देशभरातील बहुतेक शाळांमध्येही आता 'एआय' शिक्षणाला प्रोत्साहन दिले जात आहे आणि शालेय मुलांना 'एआय' कोर्स शिकवले जात आहेत.

सध्याच्या काळात 'एआय'ने अनेक पारंपरिक नोकऱ्यांची जागा घेतली आहे. अशा परिस्थितीत 'एआय' चे मूलभूत किंवा प्रगत ज्ञान असलेल्यांना नोकरीच्या संधींमध्ये अधिक प्राधान्य दिले जात आहे. शालेय शिक्षण पूर्ण केलेले विद्यार्थी, कॉलेजमध्ये प्रवेश करण्यापूर्वीच 'एआय कोर्स' करून कॉर्पोरेट जगात प्रवेश करण्याची तयारी सुरू करू शकतात. 'एआय' हे डेटा सायन्स, इंजिनीअरिंग आणि सामाजिक प्रभाव यांसारख्या क्षेत्रांमध्ये क्रांती घडवत आहे. शाळेतच 'एआय'ची मूलभूत समज विकसित केल्याने केवळ 'टेक्निकल स्किल्स' वाढत नाहीत, तर कॉलेजमध्ये कॉम्प्युटर सायन्स किंवा संबंधित कोर्सेसमध्ये प्रवेश मिळवताना स्पर्धात्मक फायदा मिळतो. हे कोर्स प्रामुख्याने प्रोग्रामिंग, नैतिक वापर आणि 'प्रोजेक्ट-बेस्ड लर्निंग'वर केंद्रित आहेत. ते कॉलेज ॲप्लिकेशन्स आणि रिसर्चसाठीही उपयुक्त ठरतात.

**शालेय विद्यार्थ्यांसाठी 'टॉप' ५ 'एआय' कोर्सेस**

❊ एमआयटी बीवर वर्क्स समर इंस्टिट्यूट हा एक विनामूल्य 'एआय' प्रोग्राम आहे, जो 'प्रोजेक्ट-बेस्ड लर्निंग' प्रदान करतो. यात 'ऑटोनॉमस व्हेईकल्स' आणि 'एआय' मॉडेल्स बनवण्याचा समावेश आहे. हा कोर्स कॉलेजमध्ये आणि नैतिकता यांसारख्या विषयांचा समावेश आहे. यासाठी प्रोग्रामिंगचा कोणताही पूर्वीचा अनुभव आवश्यक नाही. हा कोर्स कॉलेजमध्ये 'सीएस' किंवा 'डेटा सायन्स'च्या अभ्यासासाठी एक मजबूत पाया तयार करतो.

❊ हार्वर्ड एक्स इंट्रोडक्शन टू एआय विथ पायथॉन हा कोर्स पायथॉनमध्ये 'एआय' आणि मशीन लर्निंगची मूलभूत तत्त्वे शिकवतो. त्यात सर्च अल्गोरिदम, 'रीइन्फोर्समेंट लर्निंग' आणि 'न्यूरल नेटवर्क'चा समावेश आहे. हा मध्यम स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी आहे आणि कॉलेजमध्ये डेटा सायन्स प्रोजेक्ट्ससाठी उपयुक्त आहे.

❊ 'एआय ४ ऑल ओपन लर्निंग प्रोग्रम हा एक 'सेल्फ-पेस्ड' प्रोग्राम आहे, जो डेटा सायन्स आणि 'एआय'ची मूलभूत माहिती शिकवतो. हा कोर्स विशेषतः 'एआय'च्या नैतिक वापराच्या आणि सामाजिक प्रभावाच्या पैलूंवर लक्ष केंद्रित करतो. स्टेम (विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, गणित) आणि नॉन-स्टेम अशा दोन्ही क्षेत्रांमध्ये रुची असलेल्या विद्यार्थ्यांसाठी हा आदर्श आहे.

❊ कार्नेजी मेलॉन युनिव्हर्सिटी एआय स्कॉलर्स हा चार आठवड्यांचा विनामूल्य उन्हाळी प्रोग्राम हायस्कूलमधील 'सिनियर' विद्यार्थ्यांसाठी आहे. यात 'प्रोजेक्ट-बेस्ड लर्निंग' आणि कॉलेजच्या तयारीचा समावेश आहे.

## मोबाईल मॅनिया

### भूकंप होण्याअगोदर मोबाईल देईल संकेत





नैसर्गिक आपत्ती टाळता येत नाहीत. त्या अचानक येतात आणि लाखो लोकांचे जीवन बदलतात. भूकंप हीदेखील अशीच एक आपत्ती आहे. त्यामुळे दर वर्षी जगभरात मोठ्या प्रमाणात जीवित आणि मालमत्तेचे नुकसान होते. भूकंप थांबवण्याचा कोणताही मार्ग नाही; परंतु त्याच्या आगमनाची सूचना मिळवून मोठे नुकसान टाळता येते. भूकंप झाल्यास वापरकर्त्यांना सतर्क करणारे फीचर अँड्रॉइड फोनमध्ये आहे. अँड्रॉइडवर भूकंप अलर्ट २०२० मध्ये सुरू झाले. 'गुगल'ने या वर्षी जुलैमध्ये हे फीचर भारतात आणले. 'गुगल'चे म्हणणे आहे, की २०२० मध्ये लाँच झाल्यापासून, त्यांनी आतापर्यंत दोन हजारांहून अधिक भूकंप शोधले आहेत. २०२३ मध्ये, त्यांनी फिलीपिन्समध्ये ६.७ तीव्रतेचा भूकंप शोधला आणि सुमारे २.५ दशलक्ष लोकांना आश्रय घेण्यासाठी अलर्ट पाठवला. कंपनीच्या मते हे फीचर पूर्ण क्षमतेने काम करत नाही; परंतु त्याची क्षमता वाढवण्यासाठी काम सुरू आहे.

**हे फीचर कसे कार्य करते?**

बहुतेक स्मार्टफोनमध्ये 'ॲक्सेलेरोमीटर' बसवलेले असतात. हे छोटे सेन्सर फिटनेस ट्रॅकिंगमधील पायऱ्या मोजतात आणि फोन फिरवल्यावर स्क्रीनची दिशा बदलण्यासाठी वापरले जातात.

## त्याच्या आईचा हस्तक्षेप वाढतोय...




मॅच मेकिंग

मी २१ वर्षांची तरुणी आहे. गेल्या तीन वर्षांपासून एका मुलासोबत रिलेशनशीपमध्ये आहे. आमचं सगळं सुरळीत सुरू होतं. पण त्याने आमच्याबद्दल घरी सांगितल्यानंतर त्याची आई आमच्या विविध गोष्टींमध्ये नाक खुपसू लागली आहे. आधी आमच्यातली भांडणं आम्हीच सोडवायचो. पण आता भांडण झाल्यावर त्याची आई मला फोन करते. कुठे फिरायला जायचं म्हटलं की तो आधी घरच्यांना विचारतो. मध्यंतरी दोन वेळा आम्ही चित्रपट बघायचा प्लॅन केला. पण नेमकी तेव्हाच त्याची आई आजारी पडल्याने सगळंच बारगळलं. मी याबाबत माझ्या मित्राशी बोलले. पण तो मलाच दोष देत आहे. आम च्यात असा विसंवाद कधीच नव्हता. ही परिस्थिती कशी हाताळू?

**उत्तर :** तू या नात्यापासून स्वतःला थोडं बाजूला कर. तुला कशातून आनंद मिळतो हे ठरव. आयुष्याकडून तुला नेमकं काय हवं आहे हे जाणून घे. प्रियकराकडे तुझ्या भावना व्यक्त कर. त्याच्या वागण्याने दुःख झाल्याचंही सांग. तुला त्याच्या कुटुंबियांबद्दल आदर वाटत असल्याचं आवर्जून नमूद कर. या नात्याच्या काही मर्यादा ठरव. यामुळे तू प्रियकराला समजून घेऊ शकशील. तसंच त्यालाही ही परिस्थिती हाताळायला वेळ मिळेल. त्याचीही द्विधा मनस्थिती होत असेल. तू आणि आई यांच्या कात्रीत तो सापडला असेल. तसंच लग्नाआधी समुपदेशकांचीही मदत घे.

## ॲप वर्ल्ड

### व्हॉट्स ॲपचे नवे फीचर





व्हॉट्स ॲप हे जगातील सर्वात लोकप्रिय मेसेजिंग ॲप असून ते अँड्रॉइड वापरकर्त्यांसाठी सतत नवीन आणि रोमांचक फीचर आणत असते. एका नव्या अपडेटद्वारे वापरकर्ते आता स्टिकर्स थेट तयार करून सेव्ह करू शकतील. त्यांना चॅटमध्ये पाठवण्याची गरज भासणार नाही. हे फीचर सध्या व्हॉट्स ॲप बीटा व्हर्जनमध्ये दिसले असून पुढील काही आठवड्यांमध्ये ते सर्व वापरकर्त्यांसाठी उपलब्ध होईल अशी अपेक्षा आहे. आतापर्यंत व्हॉट्स ॲपवर स्टिकर तयार करण्यासाठी वापरकर्त्यांना ते प्रथम एखाद्या चॅटमध्ये पाठवावे लागत होते; मात्र या नव्या फीचरमुळे ही प्रक्रिया अधिक सुलभ होणार आहे. आता वापरकर्ते स्टिकर तयार करून ते थेट 'फेव्हरेट्स'मध्ये किंवा स्टिकर पॅकमध्ये सेव्ह करू शकतील. यामुळे स्टिकर्स व्यवस्थित ठेवणे आणि चॅटदरम्यान अनावश्यक व्यत्यय टाळणे सोपे होईल.

**नवीन फीचर कसे काम करेल?**

स्टिकर तयार केल्यानंतर वापरकर्त्यांना एक नवीन विंडो दिसेल. त्यात काही पर्याय उपलब्ध असतील स्टिकर 'फेव्हरेट्स' मध्ये जोडणे, विद्यमान स्टिकर पॅकमध्ये समाविष्ट करणे, नवीन स्टिकर पॅक तयार करून त्यात सेव्ह करणे या पर्यायातून निवड करता येईल.

## फ्युजन स्टाईलकडे कल



स्टाईल स्टेटमेंट

सणांचा हंगाम जोरात सुरू आहे. या काळात तरुणाई आपल्या पोशाखाबाबत खूप जागरूक असते. दिवाळीत पारंपरिक ट्रेंड कुर्ता-पायजमाचा असला, तरी यावेळी तरुण पारंपरिकसह फ्युजन स्टाईल फॉलो करत आहेत. डिझायनर्स कुर्ता-पायजमासह सतत प्रयोग करत असताना तरुणांवर बॉलीवूड सेलिब्रिटींच्या ड्रेसिंग सेन्सचा प्रभाव पडत आहे.

या वेळी सणांच्या हंगामामध्ये कुर्ता शॉर्ट दिसेल, तर रायडर्स पँट्स पायजम्याची जागा घेतील. पारंपरिक पाठ्यांमध्येही ही फ्युजन स्टाईल आपले स्थान निर्माण करत आहे. तरुणांना वरुण धवन आणि अर्जुन कपूरची स्टाईल सर्वात जास्त आवडत आहे आणि त्या आधारावर, ते डिझायनर्सकडून अशाच प्रकारचे डिझाइन तयार करून घेत आहेत.

शहरातील डिझायनर्स प्रयोग करत आहेत. कुर्ता शॉर्ट झाला आहे आणि रायडर्स पँट्सने पायजम्याची जागा घेतली आहे. पूर्वी ते रायडिंग पँट्स म्हणून ओळखले जात असे, १८९० म ध्ये जोधपूरमध्ये रायडिंग पँट्स बनवल्या जात होत्या. आता त्या नवीन शैलीत रायडर्स पँट्समध्ये रूपांतरित झाल्या आहेत. तरुणांना एक नवीन लूक देण्यासाठी फॅशनिस्टा मंडळी पारंपरिक शैलीतून बाहेर पडून लोकांना आकर्षित करत आहेत. अफगाणिस्तानचा पहराण, काश्मीरचा फिरन आणि नेपाळचा दौरा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कुर्ता शैलीवरदेखील प्रयोग केले जात आहेत, तर या हंगामात राजस्थानी, भोपाली, लखनऊ, मुलतानी, पठाणी, पंजाबी, बंगाली इत्यादी सर्व प्रकारच्या कुर्त्यांमध्ये बरेच बदल दिसून येत आहेत.

## पंजाबमध्ये जाताय? हे आवर्जून पाहा



भटकंती

पंजाब म्हटलं की डोळ्यांसमोर मोहरीची शेते, गिद्दा आणि भांगडा नृत्य उभं राहतं; पण पंजाब इतक्यापुरतं मर्यादित नाही. पंजाब हे इतिहास, संस्कृती, धर्म आणि रम्य निसर्गाचं एक अद्भुत मिश्रण आहे. या राज्याच्या सौंदर्यामुळे इथे एकदा आलेला माणूस पुन्हा-पुन्हा येण्याची इच्छा ठेवतो. पंजाबमधील काही ठिकाणे अशी आहेत, जिथे फिरण्यासाठी परदेशी पर्यटकही आतुर असतात.

**❊ सुवर्ण मंदिर, अमृतसर:** सुवर्ण मंदिर हे केवळ शीखांचे प्रमुख तीर्थस्थळ नाही, तर जगातील सर्वात शांत आणि आध्यात्मिक ठिकाणांपैकी एक आहे. येथील पवित्र सरोवर, संगमरवरी वास्तुकला आणि २४ तास चालणारे लंगर (मोफत भोजन) जगभरातील पर्यटकांना आकर्षित करतात.

**❊ वाघा बॉर्डर, अमृतसर:** भारत-पाकिस्तान सीमेवर होणारी 'बीटिंग रिट्रीट सेरेमनी' हा एक रोमांचकारी अनुभव आहे. देशभक्तीचा जोश, गर्दी आणि सैनिकांची गर्वाने भरलेली चाल परदेशी पर्यटकांनाही भारावून टाकते.

**❊ आनंदपूर साहिब:** पंजाबच्या रूपनगर जिल्ह्यात असलेले हे ठिकाण शीख धर्माचे जन्मस्थान मानले जाते. तख्त श्री केसगढ साहिब आणि वार्षिक 'होला मोहल्ला' सण इथे खूप प्रसिद्ध आहे. इथे होणारे घोडेस्वारी आणि मार्शल आर्टचे थेट प्रदर्शन परदेशी पर्यटकांना आकर्षित करते.

**❊ पटियाला:** पटियालाची राजेशाही परंपरा, रंगीत बाजार आणि संगीताची परंपरा पर्यटकांना वेगळा अनुभव देतात. इथला किला मुबारक आणि बरदारी गार्डन पाहण्यासारखे आहेत. पटियाला सूट आणि पटियाला पेगसारखे शब्द इथूनच लोकप्रिय झाले आहेत.

**❊ रूपनगर:** या शहराला आधी 'रोपड' म्हणून ओळखले जायचे. हे शहर सिंधू संस्कृतीचे एक महत्त्वाचे केंद्र आहे. इथलं रोपड पुरातत्व संग्रहालय आणि सतलज नदीचा किनारा पक्षीप्रेमींसाठी स्वर्ग मानला जातो.

**❊ जलियानवाला बाग, अमृतसर:** १९१९ च्या भीषण हत्याकांडाची आठवण करून देणारी ही जागा. इथल्या भिंतींवर आजही गोळ्यांच्या खुणा पाहायला मिळतात. भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामाचा संघर्ष आणि भावना अनुभवण्यासाठी परदेशी पर्यटक इथे नक्की भेट देतात.

**❊ कपूरथला:** कपूरथला फ्रेंच वास्तुकलेसाठी आणि राजेशाही इतिहासासाठी प्रसिद्ध आहे. जगजीत पॅलेस आणि एलिसी पॅलेस ही येथील प्रमुख आकर्षणे आहेत. युरोपियन शैलीतील राजवाड्यांमुळे याला 'पंजाबचे पॅरिस' असेही म्हणतात.

**❊ फतेहगढ साहिब:** गुरु गोबिंद सिंग यांच्या मुलांनी बलिदान दिलेल्या ठिकाणांपैकी हे एक आहे. येथील गुरुद्वारा फतेहगढ साहिब हे केवळ शीखांसाठीच नाही, तर प्रत्येक संवेदनशील व्यक्तीने भेट द्यावी, असे महत्त्वाचे स्थान आहे.

## जहाँ का राजा व्यापारी...
# वहाँ की जनता भिखारी!

### नाना पटोलेंचा हल्लाबोल



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २२ : सद्यस्थितीत राज्यातील महामंडळेच नव्हे तर संपूर्ण राज्य सरकारच तोट्यात आल्याची टीका काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष तथा आमदार नाना पटोले यांनी केली आहे.

सद्यस्थितीत महामंडळच नव्हे तर हे सरकारही तोट्यात सापडले आहे. यामुळे सरकारला दरमहा ओव्हरड्राफ्ट घेऊन सरकारी कर्मचाऱ्यांचे पगार करावे लागत आहेत, असे ते म्हणालेत. यावेळी त्यांनी पंतप्रधान मोदींवर शरसंधान साधत त्यांच्यामुळे देशातील सर्वसामान्य माणूस आर्थिक संकटात सापडल्याचाही दावा केला.

नाना पटोले सोमवारी पत्रकारांशी बोलताना म्हणाले, सद्यस्थितीत महायुती सरकार पूर्णपणे तोट्यात सापडले आहे. या सरकारने विविध जातींसाठी महामंडळांची स्थापना केली. ही महामंडळे फक्त त्या - त्या जातींना दाखवण्यापुरते होते.

त्या महामंडळांसाठी कोणतीही आर्थिक तरतूद करण्यात आली नव्हती. आत्ता हे सरकार ओबीसी विरुद्ध मराठा असा वाद उभा करून त्यावरून लक्ष हटवण्याचा प्रयत्न करत आहे. त्यामुळे महामंडळच नव्हे तर हे सरकारही तोट्यात आहे. या सरकाला दरमहा ओव्हरड्राफ्ट घेऊन सरकारी कर्मचाऱ्यांचे पगार करावे लागत आहेत अशी परिस्थिती महाराष्ट्रात निर्माण झाली आहे.

नाना पटोलेंनी एका ट्विटद्वारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरही निशाणा साधला आहे. जेथील राजा व्यापारी, तेथील जनता भिकारी.

मोदीजी, तुम्हाला माहिती आहेच की पंतप्रधान झाल्यानंतर तुम्ही बाबासाहेब आंबेडकर यांच्या लोककल्याणकारी आर्थिक धोरणाऐवजी आरएसएस-भाजपच्या भांडवलशाही समर्थक आर्थिक धोरणे आणली. जीएसटी लागू करून तुम्ही सामान्य लोकांचे खिसे कापले आणि तुमच्या काही उद्योगपती मित्रांची तिजोरी भरली. म्हणूनच आज देश कर्जाच्या ओज्याने दबला गेला आहे. यामुळे सामान्य लोक दिवसेंदिवस गरीब होत आहेत.

स्वातंत्र्यदिन साजरा करत असतानाच तुम्ही संसद भवनात 'जीएसटी उत्सव' साजरा केला. जनतेला वाटले की, जीएसटी सर्वांच्या हितासाठी असेल, परंतु देशाची लूट झाली आणि तुमच्या मित्रांची समृद्धी झाली. काही वस्तूंवरील जीएसटी कमी केल्याने लोकांचे दुःख कमी होणार नाही. जिथे व्यापारी राजा असतो, तिथे जनता भिकारी असते ही म्हण आज तुमच्या राजवटीला पूर्णपणे लागू पडते. जनतेला लुटणे आणि तुमच्या मित्रांना फायदा मिळवून देणे, हा तुमचा जीएसटी उत्सव आहे का? असा सवाल नाना पटोले यांनी या प्रकरणी उपस्थित केला आहे

# संचलनात सहभागी होणार २१ हजार स्वयंसेवक




■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २२ : यंदा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा दसरा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. या कार्यक्रमात तब्बल २१ हजार स्वयंसेवक सहभागी होणार असून, शंकर महादेवन यांच्या गीताचा एक कार्यक्रमही होणार आहे, अशी माहिती राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनी नागपूर येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

संघाचा हा शताब्दी दसरा उत्सव आहे. त्यामुळे तो इतर उत्सवापेक्षा तीन पट मोठा असेल. संघाविरुद्ध सुरू असलेल्या फेक नॅरेटीव्हला गृहभेटींतून उत्तर दिले जाईल, निर्धारही आंबेकर यांनी बोलून दाखवला. तसेच यावर्षी घाना, थायलंड, इंडोनेशिया, दक्षिण आफ्रिका, अमेरिका आदी देशातून प्रतिनिधी उपस्थित राहणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

**स्वयंस्फुर्तीने सहभाग**

सुनील आंबेकर म्हणाले की, समाजातील प्रत्येक घटकासह संपूर्ण समाजाला आपल्या देशाविषयी गर्व आणि अभिमान वाटत आहे. देशाची प्रगती आणि संपन्नतेसाठी संघाने चालवलेले कार्य आणि उपक्रमात अनेक संस्था, संघटना आणि व्यक्ती स्वयंस्फुर्तीने सहभागी होत आहेत. हीच संघ शताब्दीची मोठी उपलब्धी आहे.

**उत्सव तीनपट भव्य**

आंबेकर म्हणाले की, संघ शताब्दी वर्षात प्रत्येक गोष्ट किमान तीन पट मोठी आणि भव्य दिव्य राहणार आहे. एरव्ही दसरा उत्सवात साधारणतः ७ हजार स्वयंसेवक गणवेशात असतात. शताब्दी दसरा उत्सवात किमान २१ हजार स्वयंसेवक पूर्ण गणवेशात राहावे असा प्रयत्न आहे. त्यासाठी संपर्क आणि संवादातून प्रयत्न केले जात असल्याचे आंबेकर यांनी सांगितले.

**परदेशी प्रतिनिधी येणार**

यावर्षी शहरातून तीन पथसंचलने निघतील. त्याचे एकत्रीकरण व्हरायटी चौकात होणार असून सरसंघचालक मोहन भागवत त्याचे अवलोकन करणार आहे. तसेच यावर्षी घाना, थायलंड, इंडोनेशिया, दक्षिण आफ्रिका, अमेरिका आदी देशातून प्रतिनिधी उपस्थित राहणार असल्याचे आंबेकर यांनी सांगितले. दसरा उत्सव नागपूर, मणिपूरसह संपूर्ण देशात साजरा होणार आहे. शहरातील वस्ती तसेच आठ ते दहा गावांचे एक मंडळ तयार करून दसरा उत्सव साजरा होणार आहे. याच प्रमाणे हिंदू संमेलनेही घेण्यात येईल.

**फेक नॅरेटीव्हला उत्तर**

संघाविषयी फेक नॅरेटीव्हद्वारे अनेक गैरसमज पसरवले जातात. शताब्दी वर्षात गृहभेटींद्वारे संपकार्तून संवाद साधला जाणार आहे. यात संघाविषयी जनमानसात असलेले गैरसमज दूर करण्यात येईल. संघाविषयी पसरवण्यात येत असलेल्या फेक नॅरेटीव्हला गृहभेटींतून उत्तर दिले जाईल. या शिवाय संघ विचारांच्या समर्थकांनीही हे काम करावे. त्यासाठी वेगळी यंत्रणा उभारण्याची गरज नाही, असे आंबेकर यांनी सांगितले.

**महादेवनच्या संघ गीतांचा कार्यक्रम**

प्रसिद्ध गायक आणि संगीतकार पद्मश्री शंकर महादेवन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची गाणी नवीन सूर आणि लयीत गायली आहेत. संघाच्या शताब्दी वर्षपूर्तीनिमित्त स्वयंसेवकांना त्यांच्याकडून ही एक अनोखी भेट असेल. महादेवन यांनी गायलेल्या संघ गीतांचा कार्यक्रम येत्या रविवार २८ रोजी नागपुरात आयोजित करण्यात आल्याची माहिती आंबेकर यांनी दिली. संघ शताब्दी निमित्त प्रत्येक जण आपापल्या परीने योगदान देत आहे. शंकर महादेवन हे गायक असल्याने त्यांनी संघ गीते गायल्याचे त्यांनी सांगितले.

## नागपूरसह अन्य विद्यापीठांच्या कुलगुरूपदाची
# निवड प्रक्रिया लवकरच होणार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २२ : महाराष्ट्राच्या विद्यापीठांमधील अनेक महिन्यांपासून कुलगुरूंची नियुक्ती रखडलेली आहे. नुकतेच गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी महाराष्ट्राचे राज्यपाल पदाची शपथ घेतल्यामुळे लवकरच कुलगुरू नियुक्तीची प्रक्रिया प्रक्रियेला गती येण्याची शक्यता आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरू पदाची प्रतीक्षा आता संपली आहे. तब्बल ७६ उमेदवारांनी कुलगुरूसाठी अर्ज केले असून छाननीनंतर २८ उमेदवारांना सादरीकरणासाठी ई मेल पाठवण्यात आल्याची माहिती आहे.

या उमेदवारांचे ३ आणि ४ ऑक्टोबरला सादरीकरण होणार आहे. यामध्ये नागपूर विद्यापीठाशी संलग्नित आठ ते दहा उमेदवार असून काही कुलगुरू आणि प्राचार्यांचाही समावेश असून, सादरीकरणानंतर अंतिम पाच उमेदवारांची मुलाखतीसाठी निवड होईल.

नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरू पदासाठी शेवटल्या दिवसांपर्यंत जवळपास ७६ इच्छुक प्राध्यापकांनी कुलगुरू पदासाठी अर्ज केले होते. विद्यापीठाचे दिवंगत कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांचे निलंबन झाल्यानंतर त्यांच्या निधनापासून कुलगुरूपद हे प्रभारींच्या भरवशावर आहे. कुलगुरुपदासाठी जवळपास ७६ इच्छुकांनी अर्ज केलेत. त्यानंतर अर्जाची छाननी, सादरीकरण आणि त्यांच्या मुलाखती घेतल्या जातात. त्यापैकी अंतिम पाच जणांची राज्यपाल कार्यालयाद्वारे मुलाखत घेतल्यावर उर्वरीत प्रक्रिया पूर्ण होवून नागपूरसह अन्य विद्यापीठाला नवीन कुलगुरू मिळणार आहे.

# कीटकनाशक फवारणी करताना तरुणाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, गोंदिया, दि. २२ : जिल्ह्यातील अर्जुनी मोरगाव तालुक्यातील खांबी-पिंपळगाव येथे, एक तरुणाचा शेतात धानावर कीटकनाशक फवारणी करताना विषबाधा होऊन मृत्यू झाला. चेतन विनायक खोटेले (२८) असे त्याचे नाव आहे.

चेतन खोटेले शनिवार २० सप्टेंबर रोजी दुपारी १ वाजताच्या सुमारास त्याचा मित्र विशाल मोरेश्वर ब्राह्मणकर सोबत कीटकनाशक फवारणी करण्यासाठी शेतात गेला होता. फवारणी केल्यानंतर तो दुपारी २:३० वाजता घरी परतला. त्यानंतर त्याला मळमळ होऊ लागली. त्याच्या पालकांनी त्याला प्राथमिक उपचार दिले आणि अजुर्नी मोरगाव येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. चेतनची प्रकृती बिघडल्याने त्याला गोंदिया येथे पाठवण्यात आले.

गोंदियातील केटीएस रुग्णालयात पोहोचताच डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. २१ सप्टेंबर रोजी त्याचे शवविच्छेदन करण्यात आले.

# कॉलेज कॅम्पसमध्ये कार स्टंट



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २२ : नागपुरात स्कूलबसमध्ये अपघातात शालेय विद्यार्थ्यासह बस चालकाचा मृत्यूची घटना ताजी असतांनाच एका कॉलेज कॅम्पसमध्ये चक्क कारमध्ये बसून स्टंटबाजी करतानाचे व्हिडीओ व्हायरल झाले आहे.

नागपूर शहरातील जी. एच. रायसोनी इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांनी बीएमडब्ल्यू कारने धोकादायक स्टंट केल्याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. शेकडो विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत कॉलेज कॅम्पसमध्ये हा प्रकार घडला असून, वाहनावर नंबर प्लेट नसल्याचे स्पष्ट दिसत आहे. घटनेनंतर कॉलेज प्रशासनाकडून अद्याप अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही.


स्टंटबाजीदरम्यान कार अतिवेगाने वळविणे, अचानक ब्रेक मारणे आणि धोकादायक पद्धतीने फिरविण्याचे दृश्ये व्हिडिओत दिसून येतात. विद्यार्थी आनंदात आरोळ्या ठोकत असताना सुरक्षेचे सर्व नियम धाब्यावर बसवले गेले. अशा प्रकारच्या स्टंटबाजीमुळे एखादा अपघात घडला असता, तर शेकडो विद्यार्थ्यांचे प्राण धोक्यात आले असते, अशी चिंता पालकांमध्ये व्यक्त होत आहे.

याच पार्श्वभूमीवर नागपुरात नुकत्याच झालेल्या मानकापूर येथील शाळकरी बस अपघाताची आठवण ताजी झाली आहे. बेपर्वाई आणि वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन यामुळे अनेक वेळा निष्पाप विद्यार्थ्यांचे जीव धोक्यात येतात.

मानकापूरच्या बस अपघातात दोघांचा मृत्यू आणि बरेच विद्यार्थी गंभीर जखमी झाले होते. या घटनेनंतर विद्यार्थ्यांची स्थिती पाहून संपूर्ण नागपूर हादरले होते. तरीही काही विद्यार्थी आणि संस्थांकडून अशा प्रकारची बेफिकीर कृत्ये सुरुच आहेत, हे गंभीर आहे.

नागपुरातील कार स्टंटच्या घटनेमुळे शहरात चर्चा रंगली असून, शिक्षणसंस्थांमधील शिस्त व जबाबदारीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सोशल मीडियावर अनेकांनी संताप व्यक्त करत प्रशासनाने त्वरित कठोर पावले उचलावीत अशी मागणी केली आहे. शैक्षणिक परिसरात होणारी स्टंटबाजी ही केवळ कायद्याचे उल्लंघन नसून, भविष्यातील गंभीर अपघातांना आमंत्रण ठरू शकते, असा इशाराही नागरिकांकडून दिला जात आहे. विद्यार्थ्यांनी धोकादायक रोमांचाऐवजी शिस्त, सुरक्षितता आणि जबाबदारीचे धडे घ्यावेत, असे आवाहन होत असून, पोलिसांच्या कारवाईकडे लक्ष लागले आहे.

## लोकारोग्य
# रक्ताचे विकार कारण आणि उपचार



मानवी शरीराला ऊर्जा पुरवठा करणारा एक महत्वपूर्ण घटक म्हणजे रक्त. आपल्या शरीराला आवश्यक असलेल्या आहारातील विविध पदार्थ हे शरीरात रक्तनिर्मिती करण्यास कारणीभूत ठरतात. मानवाच्या शरीरांतर्गत अगदी मेंदूपासून ते हृदयापर्यंत आणि हृदय ते किडनी असे रक्त हे धमन्यांमधून अखंडपणे वाहत असते.

म्हणूनच आपण एक सजीव म्हणून शरीरातील याच रक्ताच्या आधारे सहज सर्व क्रिया करत असतो. परंतु अनेकदा शरीरांतर्गत याच रक्तामध्ये काहीतरी विकार उदभवतो आणि मग आपल्या शरीरातील ठराविक अवयव निष्क्रिय बनतो. त्यामुळे आपली अवस्था हि अचल बनते. आपल्या शरीरासाठी आवश्यक असलेल्या याच रक्ताचे नेमके कोणकोणते विकार उद्भवतात? आणि त्याची कारण काय असतात? त्यावर उपचार काय आहेत? याच प्रश्नाची उकल करण्यासाठी डॉ. अभय साठे यांच्याशी केलेली बातचीत.

**रक्त विकाराचे प्रकार नेमके किती आणि कोणते?**

■ रक्ताच्या विकाराचे वर्गीकरण रक्ताच्या घटकांच्या आधारावर केले जाऊ शकते. यामध्ये लाल रक्तपेशींचे विकार असतात. लाला रक्त पेशी फुफ्फुसातून शरीराच्या इतर भागात ऑक्सिजन वाहून नेण्यासाठी जबाबदार असतात. लाला रक्तपेशींच्या विकारात अशक्तपणा, सिकलसेल आजार, थॅलेसेमिया असे आजार उद्भवू शकतात. पांढऱ्या रक्तपेशींच्या विकारात ल्युकोपेर्निया, ल्युकोसायटोसीस हे आजार उद्भवतात. याशिवाय प्लेटलेट्स विकार, प्लाज्मा सेल विकार, असे रक्ताचे अनेक विकार सांगता येतील.

**रक्तविकाराची कारण काय सांगता येतील?**

■ रक्त विकाराची कारण हि बहू आयामी आहेत. आणि अनुवांशिक कारण देखील असतात. अनेक रक्त विकारांमध्ये अनुवांशिक घटक असतात. जसे कि सिकलसेल रोगआणि थॅलेसेमिया.तसेच विशिष्ट प्रकारचा अशक्तपणा हे आजार अनुवांशिक असतात.

लोह, व्हिटॅमिन,बी १२,आणि फोलेट सारख्या महतवाच्या पोषक तत्वांच्या कमतरतेमुळे देखील रक्तविकार होतात. काही रक्त विकार जसे कि ऑटो इम्यूनहोमलाईट, ॲनिमिया आणि इम्यून ठोंरोसायटेपिया हे विकार रोगप्रतिकारक शक्ती कमी झाल्याने होतात. गंभीर संक्रमण आणि काही औषध तसेच अस्थी मज्जा विकार अशा कारणामुळे रक्ताचे विकार होतात.

**रक्त विकाराची लक्षण काय असतात?**

रक्त विकाराची स्थिती आणि प्रकारानुसार लक्षण बदलतात. थकवा आणि अशक्तपणा अनेकदा ॲनिमिया आणि लाल पेशींची कमतरता यामध्ये दिसून येतो. वारंवार संक्रमण हे पांढऱ्या रक्तपेशी विकाराचे सूचक असते.

जास्त रक्तस्त्राव आणि जखम प्लेटलेट विकारामध्ये दिसतो. हाडे दुखणे, श्वास लागणे, सुजलेल्या लिम्फ नोंड्स हि रक्तविकाराची लक्षण असतात.

**रक्त विकारावर कोणकोणते उपचार आहेत?**

■ रक्तविकाराची स्थिती आणि प्रकार यानुसार उपचाराची दिशा देखील बदलते. अनेक रक्त विकारांमध्ये औषध हा प्राथमिक उपचार ठरतो. ॲनिमियाच्या उपचारामध्ये लोहाची कमतरता भरून काढणायसाठी औषध आणि काही आहार दिला जातो. सिकलसेल विकारात वेदना कमी करण्यासाठी हायड्रॉक्सीयुरिया हे औषध दिले जाते.

स्वयंप्रतिकार रक्तविकार व्यवस्थापित करण्यासाठी इम्युनोस्प्रेझेन्टस औषध देतात. थॅलेसेमिया प्रकारात रक्त संक्रमण केले जाते. मॉटपाल मायलोमा या विकारात केमोथेरॅपी आणि रेडिएशनचा वापर होतो. तर अस्थिमज्जा पराकारात अस्थी मज्जा प्रत्यारोपण करतात. याशिवाय जीवनशैलीमध्ये आणि आहारात बदल देखील एक उपचार पद्धतीचं आहे.

■ ■ ■

## विदर्भाला येलो अलर्ट

■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २२ : पावसाने झोडपलेल्या विदर्भासह महाराष्ट्राला पुन्हा एक धोक्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. राज्यातल्या अनेक भागात पुन्हा एकदा अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता असून, विदर्भाला येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

मध्य महाराष्ट्रातल्या काही जिल्ह्यांमध्ये जोरदार पावसाचा अंदाज असून ४०-५० किमी प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे . विदर्भाच्या काही जिल्ह्यात मुसळधार पावसाचाही अंदाज वर्तवण्यात आला आहे.

# रुग्णावर ओपनहार्ट सर्जरी यशस्वी



पुणे येथील रहिवासी प्रशांत चंद्रकांत झळके यांची चौथी ओपन-हार्ट शस्त्रक्रिया वाचली आहे. ही एक असाधारण प्रक्रिया होती ज्यामध्ये डॉक्टरांनी जीवघेण्या रक्तस्त्रावावर नियंत्रण ठेवण्यासाठी त्यांची छाती २४ तास उघडी ठेवली होती.

१२ ऑगस्ट रोजी फरीदाबाद येथील अमृता रुग्णालयात वरिष्ठ हृदयरोग शल्यचिकित्सक डॉ. समीर भाटे यांच्या नेतृत्वाखाली ही जटिल शस्त्रक्रिया करण्यात आली. ऑपरेशन टीमला अनेक गुंतागुंतींना तोंड द्यावे लागले, ज्यामध्ये प्रक्रियेदरम्यान फाटलेली धमनी होती ज्यासाठी आपत्कालीन बायपासची आवश्यकता होती.

रुग्णाने शस्त्रक्रियेमध्ये अकरा तास मॅरेथॉन घालवले, त्यापैकी सात कार्डिओपल्मोनरी बायपासवर होते.

आम्हाला अनेक आव्हानांचा सामना करावा लागला. प्रक्रियेच्या अर्ध्या वाटेवर, आम्ही अनवधानाने त्याच्या हृदयाची एक धमनी फाडली. बायपासने ती ताबडतोब दुरुस्त करावी लागली, असे डॉ. भाटे म्हणाले. म्हणून, आम्ही त्यांची छाती २४ तास उघडी ठेवण्याचा आणि काळजीपूर्वक पॅक करण्याचा निर्णय घेतला आणि दुसऱ्या दिवशी ती बंद करण्याचा निर्णय घेतला, ही एक पद्धत मी माझ्या वडिलांकडून शिकलो. हे नेहमीचे पाऊल नाही, परंतु कधीकधी असे कठीण निर्णय हे जीव वाचवण्याचा एकमेव मार्ग असतात.

झाल्के यांचा संधिवाताच्या हृदयरोगाचा त्रास २० वर्षांहून अधिक काळ सुरु होता, ज्यामध्ये वारंवार झडप निकामी होण्याचे प्रकार घडत होते.

त्यांचे महाधमनी आणि मायट्रल दोन्ही झडपे २००२ मध्ये पहिल्यांदा बदलण्यात आली, त्यानंतर २०१२ मध्ये टिश्यू रिप्लेसमेंट, २०२२ मध्ये मेकॅनिकल मायट्रल झडप आणि शेवटी २०२४ मध्ये आणखी एक मेकॅनिकल महाधमनी झडप बदलली गेली.

■ ■ ■

# मी गप्प बसणार नाही!

## आव्हाड यांचा पडळकरांना इशारा



■ वृत्तसंस्था सांगली, दि. २२ : भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांच्याविषयी बोलताना वादग्रस्त विधान केले होते. त्यानंतर गोपीचंद पडळकर यांच्यावर विरोधकांनी हल्लाबोल केला आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी प्रतिक्रिया देत म्हटले की जयंत पाटील गप्प बसले असतील पण मी गप्प बसणार नाही, असा इशारा पडळकर यांना दिला आहे.

सांगली येथे राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या वतीने संस्कृती बचाव मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. या मोर्चात पक्षाचे सर्वच नेते उपस्थित होते. जितेंद्र आव्हाड माध्यमांशी बोलताना म्हणाले, असेच बोलत रहा, आपल्या ओरिजनल संस्कृतीची महाराष्ट्राला ओळख करून द्या, आपण कसे आहोत हे महाराष्ट्राला कळले पाहिजे. आपण ओरिजनल कसे आहोत हे सर्वांना समजू द्या.

जयंत पाटील गप्प बसले असतील पण मी गप्प बसणार नाही, असा इशाराही जितेंद्र आव्हाड यांनी गोपीचंद पडळकर यांना दिला आहे. विधीमंडळात मंगळसूत्र चोर म्हणून का ओरडलो याबाबतचा खुलासा आव्हाड यांनी केला.मला पाहून पडळकर हा बघा आला लांड्याचा, असे म्हणाले होते. म्हणून मी त्या दिवशी जे बोलायचे ते बोललो, असे जितेंद्र आव्हाड यांनी स्पष्ट केले.

## मंदिरावर रोषणाई करताना
# विद्युत करंटने युवकाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. २२ : सिंदखेडराजा तालुक्यातील साखरखेर्डा येथील नवरात्र उत्सवाची जोरदार तयारी सुरु असतांना वीजेचा शॉक लागून तरूणाचा मृत्यू झाला . वार्ड क्रमांक एक मधील देवीच्या मंदिरावर विद्युत रोषणाई करताना एका २३ वर्षीय युवकाचा मृत्यू झाला. सतीश विटेकर (वय २३) असे मृतकाचे नाव आहे.

जालना येथील रहिवासी सतीश विटेकर (वय २३) हा मामा दत्ता लष्कर यांच्याकडे नवरात्रोत्सव साजरा करण्यासाठी आला होता. वडार समाजाचे कुलदैवत जगदंबा माता मंदीर असून त्या मंदिरावर विद्युत रोशनाई केली जात होती . त्या मंदिराच्या परिसरात मेहकर ते साखरखेर्डा ३३ केव्ही सबस्टेशनला जोडणारी वीज तार गेली आहे .

सतीश हा मंदिरावर चढला असता चार ते पाच फुट अंतरावर असलेल्या ३३ के व्ही विज प्रवाहामुळे तो खेचला गेला . काही कळण्यापुर्वी हा युवक खाली पडून दगवला . ही घटना घडली असताना मामा दत्ता लष्कर आणि इतर नातेवाईक तेथेच उपस्थित होते . सतीश यास तातडीने चिखली येथे रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले .

# कर्करोग उपक्रमासाठी कॅनकिड्सला सर्वोत्कृष्ट भारतीय सीएसआर पुरस्कार




बालपणीच्या कर्करोगासाठी समर्पित भारतातील सर्वात मोठी आणि एकमेव राष्ट्रीय स्वयंसेवी संस्था कॅनकिड्स किड्सकॅनने अभिमानाने घोषणा केली आहे की, त्यांच्या प्रमुख उपक्रम सायकल फॉर गोल्डर ला वषार्तील सर्वोत्कृष्ट कर्करोग उपक्रमाच्या श्रेणीमध्ये प्रतिष्ठित भारतीय सीएसआर पुरस्कार २०२५ प्रदान करण्यात आला आहे.

इतर काही पुरस्कार विजेत्यांमध्ये अमेझॉन, पीएनबी मेटलाइफ आणि एल अँड टी फायनान्स यांचा समावेश आहे. भारतीय सीएसआर पुरस्कार, शिक्षण, आरोग्यसेवा, दारिद्र्य निर्मूलन, पर्यावरणीय शाश्वतता आणि ग्रामीण विकास या क्षेत्रातील प्रभावी सीएसआर उपक्रमांसाठी व्यक्ती आणि संस्थांना मान्यता आणि सन्मानित करतात. हा पुरस्कार सायकल फॉर गोल्डच्या वकिली, रुग्ण सहभाग आणि बालपण कर्करोग परिसंस्थेला बळकटी देण्याच्या प्रभावाला मान्यता देतो.सायकल फॉर गोल्ड (सीएफजी) ही कॅनकिड्स द्वारे दरवर्षी आयोजित केलेली एक संपूर्ण भारतातील सायकलिंग चॅलेंज आहे, जिथे लोक त्यांच्या सोयीनुसार कुठेही आणि कोणत्याही अंतरासाठी सायकल चालवण्यास वचनबद्ध असतात. ४ फेब्रुवारी रोजी जागतिक कर्करोग दिनापासून सुरू झाले आणि १६ मार्चपर्यंत चालू राहिले. या कालावधीत विद्यार्थी, व्यावसायिक, डॉक्टर, कर्करोग वाचलेल्यांसह सर्व क्षेत्रातील हजारो सायकलस्वारांनी ७,३०,००० किमी पेक्षा जास्त अंतर पार करण्याचे आव्हान स्वीकारले, जगभरातील कर्करोगाने ग्रस्त सुमारे ४००,००० मुलांचा सन्मान केला. १०० शहरे आणि ३ देशांमधील चॅलेंज सहभागींसह, सीएफजीने कर्करोगाने ग्रस्त मुलांच्या काळजीसाठी २ कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी उभारला.

■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# मला रिकामे ठेवू नका, काहीतरी काम द्या..

## धनंजय मुंडेंची पक्षश्रेष्ठींना विनंती
## अजित पवारांची सकारात्मक प्रतिक्रिया




■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २२ : सत्ताधारी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते तथा माजी आमदार धनंजय मुंडे यांनी सार्वजनिक व्यासपीठावरून आपल्या पक्षश्रेष्ठींना आपल्याला रिकामे न ठेवता काहीतरी काम अर्थात जबाबदारी देण्याची विनंती केली आहे.

त्यांच्या या जाहीर विनंतीवरून राजकीय वर्तुळात संमिश्र प्रतिक्रिया येत आहेत. त्यातच आता राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांच्या विनंतीवर विचार केला जाईल असे सूतोवाच केल्याने मुंडे यांचे लवकरच राजकीय पुनर्वसन होईल असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

त्याचे झाले असे की, राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांचा रायगडमध्ये नागरी सत्कार आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात भाषण करताना धनंजय मुंडे यांनी तटकरेंवर स्तुतीसुमने उधळत आपल्याला रिकामे न ठेवता काहीतरी जबाबदारी देण्याची विनंती केली. सुनील तटकरेंनी मला वडिलांसारखा आधार दिला. आता रिकामे ठेवू नका. काहीतरी जबाबदारी द्या, असे धनंजय मुंडे म्हणाले. त्यांच्या या विधानावर वरिष्ठ योग्य तो निर्णय घेतील, असे तटकरे म्हणाले.

दुसरीकडे, अजित पवार यांनीही याविषयी योग्य तो विचार केला जाईल असे स्पष्ट केले. धनंजय मुंडे यांच्या विनंतीला मान दिला जाईल. त्यांच्या विनंतीचा योग्य तो विचार केला जाईल, असे ते म्हणाले.